# ...गाढी हुतात्में

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १५३



RFFBK-0012339

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ........
क्रमांक .................... नों दि ............

# दलितांची वृत्तपत्रें

[१८८८–१९६२]

लेखक

**आ. श्री. ऊर्फ आप्पा रणपिसे**

(महिमानगडकर)

९२३७९

प्रस्तावना लेखक—

**ग. त्र्यं. तथा भाऊसाहेब माडखोलकर**

आशिर्वाद — भदन्द आनंद कौशल्यायन
विद्यालकार युनिव्हरसीटी
कोलोंबो, सिलोन.

किंमत १ रु. ५० नये पैसे

प्रकाशक —

**भाऊसाहेब आडसूळ**

कार्यवाह, महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद

"प्रज्ञा प्रकाशन" कार्यालय ६०/३५

बी. डी. डी चाळ वरळी, मुंबई १८

*

सर्वहक्क —

**सौ सुभद्राबाई आ. रणपिसे**

मु. पो महिमानगड, ता माण

जिल्हा—सातारा यांचे स्वाधीन

*

**आवृत्ति १ ली—१९६२**

*

**प्रति—१०००**

*

मुद्रक —

**लक्ष्मीबाई नारायण चौधरी,**

निर्णयसागर प्रेस,

२६-२८ कोलभाट स्ट्रीट, मुंबई २

# समर्पण

शिक्षणांस पारखे असलेल्याना कट्टर सनातन काळांत अस्पृशांची पहिली शाळा काढून त्यांच्या आणि बहुजन समाजाच्या जागृतीस्तव वर्तमान पत्र सुरु करुन दलितांच्या वृत पत्र क्षेत्राचा पाया घालणारे महात्माजोतिबा फुले.

आणि

या पायावर उस्फूर्तपणे दलितांच्या इतर वृतपत्राद्वारें या क्षेत्रांतील जे मंदीर उभे राहूं लागले त्या चिरंतन मंदिरावरच्या वैभवाचा कळस वंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकारानीं चढविला आणि या मंदिराचें स्थान जगापुढें अबल ठेवले अशा या महान प्रवर्तकाना ही दलितांची वृत्त पत्रीय कर्तृत्वाची पुष्पमाला समर्पित.

आप्पा रणपिसे

REF BK-0012339



आ
शि
र्वा
द



महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेच्या नागपूर येथील चौथ्या साहित्य सम्मेलनांत "दलितांची वृत्तपत्रें" ह्या पुस्तकांचें प्रकाशन झालें या प्रसंगी भदंत आनंद कौशल्यायन आशिर्वाद देत असल्याचे दिसत आहेत

## भदन्त आनंदकौशल्यायनजींचा आशीर्वाद

श्री० आप्पासाहेब रणपिसे द्वारा लिखित "दलितांचीं वृत्तपत्रें" वर्तमान-पत्रोंके इतिहास मे सहायक एक विशिष्ट कृति है। महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद के ४ थें अधिवेशन के अवसर पर उसका सार्वजनिक प्रकाशन तथा स्वागत मेरे संतोष का कारण हुआ।

आशा है महाराष्ट्र बौद्धसाहित्य परिषद इसीप्रकार की उपयोगी कृतियों का अधिकाधिक प्रकाशन कर सकेगी।

सुभेच्छा
**आनंद कौशल्यायन**

विद्यालंकार युनिव्हर्सिटी,
कोलोंबो, सिलोन
दि १-६-६२

# मनोगत

माझ्या धडपड्या स्वभावानुसार महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेचा व्यवहार पहातां पहतां मागासलेल्या वर्गाच्या साहित्यांतील विविध क्षेत्रांची माहिती मिळविण्यासाठीं बहुतेक लेखक, कवि, कलावंत आणि पत्रकार यांचे घरीं जावून त्यांचें जीवन आणि व्यवसाय अवकून पाहिलें आहे आम्ही आजपर्यंत जी माहिती मिळविली आहे ती एवढी आहे कीं, ती फक्त जत्री स्वरूपात जरी द्यावयाचें ठरविलें तरी त्याचीं वेगवेगळ्या विषयांचीं विविध पुस्तकें निघू शकतील याची कल्पना मी माझ्या "आंबेडकरी साहित्य संप्रदायाचें समालोचन" या पुस्तकाच्या निवेदनांतून दिलीच आहे वंदनीय डॉ बाबासाहेब आंबेडकरांनीं सुरू केलेल्या सामाजिक चळवळींतून दलित समाजाचें जें सारस्वत प्रस्तृत झालें तें मराठी साहित्यांतील एक वेगळा विभाग आहे तेव्हां या असल्या आगळ्या आणि वैशिष्ट्यपूर्ण–असलेल्या सारस्वताची समालोचनात्मक अथवा विस्तारपूर्वक माहिती एकत्र स्वरूपांत देता येणें अवघड आहे तशी आजची परिस्थिती नाहीं तेव्हां सदर दलितांची वर्तमानपत्रें या विषयावर लिहिलेल्या पुस्तकांत दलित समाजाच्या वर्तमान पत्राच्या विषयावर सखोल असें भाष्य न करतां त्रोटक स्वरूपांत सदर विषयाची माहिती येथें दिली आहे अर्थात् वर्तमान पत्रें हा अभ्यासाला नवीन विषय असल्यानें दलित समाजांतील साहित्य लेखनाच्या प्रकारापेक्षां वेगळ्या विषयाची माहिती एकत्रित देणारें हें पहिलेंच पुस्तक आहे शिवाय सदर पुस्तकाचें औचित्य, प्रकाशकाची ऐपत, विषयाची व्याप्ति या दृष्टीनें पुस्तकाला कांहीं मर्यादा पडणें अपरिहार्य आहे

महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेचें मुखपत्र "प्रज्ञा" ह्या पत्राच्या निमित्तानें या विषयाची खूप माहिती मिळाली ती एवढी कीं, वृत्तपत्र क्षेत्राच्या उलटसुलट संपूर्ण माहितीचें एक पुस्तक काढलें तरी त्याचा एक मोठा ग्रंथ तयार होईल; त्याकरितां जिज्ञासूंनी या विषयाची जाणीव आणि महत्त्व समजावून घेतल्यास पुढील आवृत्ति समाधानकारक निघेल असें वाटतें

आमचा हा उपक्रम सामुदायिक जाणिवेंतून आणि सहकार्यांतून आहे अर्थात त्याचा लभ्यांश वैयक्तिकरीत्या कोणालाहि नाहीं उलट त्यागांतून गैरसोयींतून अत्यंत कष्ट उपसून हें अत्युत्तम आणि आवश्यक कार्य आम्ही करीत आहोंत

महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेच्या ४ थ्या साहित्य संमेलनांत वृत्तपत्रांचें प्रदर्शन भरविलें तें तेथील अनेक लोकांनीं पाहिलें तसेंच या पुस्तकाचें प्रकाशन या पवित्र स्थानीं आणि शुभप्रसंगीं वंदनीय भदंत आनंद कौशल्यायन यांच्या शुभहस्तें झालें मराठी साहित्यांतील सुप्रसिद्ध साहित्यिक आणि सव्यसाची वृत्तपत्रकार ग त्र्यं. तथा भाऊसाहेब माडखोलकर यांनीं पुरस्कार केला म्हणून समाधान वाटलें

याकामीं नागपूरचे सुप्रसिद्ध साहित्यिक ना० रा० शेंडे आणि मुंबईचे चां० भ० खैरमोडे यांचे उत्तेजन भाऊसाहेब आडसूळ आणि जनार्दन वाघमारे यांचें वात्सल्य, राजाभाऊ कुळकर्णी, हनुमंत मोरे, जयवंत कोळी यांचें सहाय्य श्री पेवेकरांची मदत निर्णयसागर प्रिंटिंग प्रेसचे व्यवस्थापक पांडुरंगराव मोरे आणि प्रेसचा कामगार वर्ग यांचे कष्ट मी विसरूं शकत नाहीं तसेंच या कामीं ज्यांचा ज्यांचा हातभार लागला त्या सर्व मित्रांचा मी आभारी आहें.

—आप्पा रणपिसे.

# पुरस्कार

माझे तरुण मित्र श्री० जनार्दन वाघमारे यानी आप्पासाहेब रणपिसे लिखित "दलितांचीं वृत्तपत्रें" या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची विनति मला केली, त्या बद्दल मी त्यांचा आभारी आहें. गेलीं चाळीस वर्षे अस्पृश्यांच्या चळवळीशीं माझा निकट संबध आहे, व त्यांच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात मी सतत भाग घेत आलेलों आहें. खुद्द या पुस्तकाचें ही प्रकाशन गेल्या मे महिन्यांत नागपूर येथें भरलेल्या बौद्ध साहित्य परिषदेच्या अधिवेशनाचा अध्यक्ष या नात्यानें मी केलेलें असून, नागपुरांतील अस्पृश्य जमातीतर्फे चालविण्यांत येत असलेल्या अनेक नियत कालिकांनाही मी यथाशक्ति सहाय्य केलेलं आहे यामुळें दलिताच्या वर्तमानपत्राविषयीं माझें विचार प्रकट करण्याची संधि या निमित्तानें मला मिळाली, या बद्दल मला आनंद वाटतो

या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या वेळीं नागपूर येथें केलेल्या भाषणांत मी असें म्हटलें होतें कीं, "मराठी वृत्तपत्रव्यवसायाच्या इतिहासावर जे दोन तीन ग्रंथ मराठींत आहेत, त्यांत न आढळणारी काहीं महत्वाची माहिती या पुस्तकाच्या रूपानें प्रथमच मराठी वाचकांपुढें येत आहे." कारण या पुस्तकांत स्वत: अस्पृशानी काढलेली आणि अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठीं स्पृश्यानी चालविलेली अशा दोन्हीं प्रकारच्या नियत कालिकाची सूचि आणि माहिती सांक्षेपानें दिलेली आहे. उदाहरणार्थ अस्पृश्य समाजांतील पहिले पत्रकार श्री० गोपाळ बाबा वालंगकर याच्या "विटाळ विध्वंसक" या १८८८ सालीं निघालेल्या वृत्तपत्राचा उल्लेख जसा या पुस्तकांतील सूचींत आहे तसाच कै. गोपाळराव आगरकर यांनीं काढलेल्या सुधारकाचाही उल्लेख तींत आहे मात्र प्रार्थनासमाजाच्या "सुबोधपत्रिका" या साप्ताहिकाचा उल्लेख या सूचींत नाहीं, हें पाहून मला आश्चर्य वाटलें. कारण "सुबोधपत्रिकेनें" अस्पृश्यता निवारणाच्या चळवळींत फार महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे प्रमुख नियतकालिकांची माहिती या पुस्तकात दिलेली असल्यामुळें, महाराष्ट्रांतील अस्पृश्य समाज हा स्वमत प्रचाराच्या बाबतींत इतर प्रांतांतील अस्पृश्य समाजापेक्षां कसा आघाडीवर आहे याची आपल्याला कल्पना येते विशेषत विदर्भांतील श्री० किसन फागुजी बनसोड आणि श्री० गणपतराव गवई यांनी व पश्चिम महाराष्ट्रांतील श्री० वालंगकर, श्री० शि जा कांबळे, आणि खुद्द डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या प्रारंभींच्या काळांत आपल्या समाजासाठीं वर्तमानपत्रें काढून जी कामगिरी बजाविली, तिची चांगली जाणीव या पुस्तकाच्या वाचनानें मराठी जनतेला होईल यांत शंका नाहीं.

या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात वृत्तपत्रांचें ध्येय आणि कार्य यांच्या विषयीं असे उद्गार काढलेलें आहेत कीं, "जीं वृत्तपत्रें देशप्रीति, राष्ट्रीयवृत्ति आणि स्वातंत्र्य हीं उच्च आणि पवित्र ध्येयतत्वें घेऊन समाजहिताचा शुद्ध विचार आणि समाजहित साधतील तींच वृत्तपत्रें खऱ्या अर्थानें आपलें कार्य पार पाडतात असें समजावें वृत्तपत्रांचें ध्येय आणि कार्य या सबधीं हे उद्गार काढलेले आहे ते अगदीं यथार्थ आहेत व अस्पृश्य समाजाची नियतकालिकें सामान्यत या ध्येयाना धरून चाललेलीं आहेत असें मला म्हणावयाला हरकत वाटत नाहीं

विशेषतः आपल्या समाजातील जातिभेद, विषमता आणि अन्याय याच्यावर प्रखर हल्ले चढवितांना सुद्धां अस्पृश्य पत्रकारांनी राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विसर पडूं दिला नाहीं हें त्यानां भूषणास्पद आहे.

या पुस्तकाच्या रूपानें मराठी साहित्याच्या एका महत्वाच्या शाखेतील अस्पृश्य समाजाच्या कामगिरीचा वृत्तांत प्रथमच संकलित स्वरूपांत मराठी वाचक वर्गापुढें येत आहे माझे मित्र श्री० आप्पासाहेब रणपिसे यांनी परिश्रम पूर्वक संशोधन करून तो इतक्या सापेक्षानें लिहिला ही गोष्ट त्यांना भूषणास्पद आहे हा वृत्तांत वाचून अस्पृश्यांतील तरुण पिढीला जशी कार्यस्फूर्ति मिळेल, त्याचप्रमाणें सर्वसामान्य मराठी जनतेला आपल्या हीन दीन अस्पृश्य बांधवांनीं अत्यंत बिकट परिस्थितींत केलेली मराठी भाषेची सेवा पाहून धन्यता वाटेल. त्या दृष्टीनें या पुस्तकाचें प्रकाशन स्वागतार्ह आहे. असें मी समजतों, व तें केल्याबद्दल महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेला धन्यवाद देतों

दादर मुबई
२ जुलै १९६२

ग. त्र्यं. माडखोलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 92338 ................ वि: ........
................ क्रो: वि ............

# वर्तमानपत्रांचा उगम आणि विकास

## प्रकरण १ लें

जगांतील नाना देशातील समाज जसजसा प्रगत होऊं लागला, तसतसें त्याच्या जीवन विषयींच्या आणि ज्ञानाविषयींच्या कल्पना आणि विचार विस्तृत होऊ लागला. अनेक राजवटींत व शासन यंत्रणेत राष्ट्रीय वृत्ती जागृत रहावी, त्या त्या देशातील लोकांच्या हिता अहिताचा राजकर्त्यांनीं विचार करावा, देशातील विविध शास्त्रें, इतिहास, कला, साहित्य, अशा अनेकविध सुधारणांचे लोण समाजापर्यंत, सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्या करिता जीं जीं साधनें आहेत त्यांत वृत्तपत्र हें एक हुकुमी आणि प्रभावी साधन आहे. वृत्त म्हणजे बातमी अथवा माहिती, तें देणारें जें पत्र त्याला वृत्तपत्र असें म्हणतात. आणि जें पत्र नियमित निघत असतें त्याला नियतकालिक म्हणतात अशी वृत्तपत्राची व्याख्या आहे. लोकशिक्षण आणि लोकसेवा ही वृत्तपत्राच्या निर्मितीची प्रेरणा आहे लोकाच्या भावना आणि विचार बोलून दाखविण्याच्या गरजेंतून वृत्तपत्राचा उगम झाला आहे.

## वृत्तपत्राचें कार्य आणि मोठेपणा

वृत्तपत्रें हीं एका अर्थानें लोकाना माहिती आणि ज्ञान देणारीं विद्यापीठेंच आहेत ! मुद्रण स्वातंत्र्याच्या आधुनिक काळात तर वृत्तपत्राचें स्थान प्रत्यक्ष अप्रत्यक्ष एखाद्या राजासारखेंच असतें. लोकशाही राजवटींत तें अन्यायाविरुद्ध उगारलेलें खड्ग आहे. वृत्तपत्रें ही समाज निर्मितीचीं साधनें आहेत. लोकाच्या मनातील परंपरागत प्रतिगामी विचाराच्या खडकाळ जमिनींत नवविचारांचा राब घालून व मशागत करून लोककल्याणाचें भरघोस पीक काढणें हें वृत्तपत्राचें कार्य असतें. असत्य गोष्टींच्या अंधःकारांतून सम्यक्‌विचाराच्या सत्याचा प्रकाश लोक-मनात पाडणें हा वृत्तपत्राचा परम धर्म होय.

जीं वृत्तपत्रें देशप्रीति, राष्ट्रीयवृत्ति, आणि स्वातंत्र्य हीं उच्च आणि पवित्र ध्येयें—तत्त्वें घेऊन समाजहिताचा शुद्ध विचार आणि समाजहित साधतील तींच वृत्तपत्रें खऱ्या अर्थानें आपलें कार्य पार पडतात, असें समजावें. देशांतील त्या त्या परिस्थितींत आणि काळात जे जिवंत प्रश्न असतील त्याना वाचा फोडून लोकमत तयार करण्याचें कार्य वृत्तपत्रानें करावयाचें असतें अन्यायावर सडेतोड हल्ले करून आपल्या राष्ट्राची शान कशी वाढेल, हा विचार करणें अशी दुहेरी कामगिरी त्याच्यावर येऊन पडते. हें करीत असतां लोकमताचीही नाडी अचूकपणें हातात धरून त्याच्या

आशा आकांक्षा सफल करण्याचें कार्य त्यांना पार पाडावें लागते. या दृष्टीनें भिन्न भिन्न मताच्या विचारप्रवाहातून शुद्ध आणि मूलगामी विचार सागून समाज हिताचा मार्ग सागणें हें अतिशय अवघड कार्यहि त्यांना पार पाडावें लागते. त्या दृष्टीनें विचार करतां वृत्तपत्र हें एक सतीचें वाणच आहे !

वृत्तपत्राचा मोठेपणा त्यानें स्वीकारलेल्या ध्येयधोरणावर अवलंबून आहे. वृत्तपत्र हें जरी जनतेच्या, सामान्य लोकांच्या हातातील अमोघ शस्त्र असलें तरी पेलता आलें पाहिजे, आणि पेलवणाराचा दृष्टिकोण शुद्ध हेतूचा असला पाहिजे. या उलट वृत्तपत्रकाचा दृष्टिकोन विकृत असेल, त्याचें ध्येय धोरण जर अन्याय करणारें असेल, शासनाच्या मर्जीखातर लोकाच्या भावना दुखविणारें असेल तर समाज-हिताच्या आणि सुधारणेच्या शुद्ध प्रवाहाला गढूळ पाण्याच्या प्रवाहाचें स्वरूप येईल ! या सर्व गोष्टी सभाळून चालणारें—वृत्तपत्र आपला मोठेपणा सिद्ध करू शकतें. अशा वृत्तपत्राच्या मोठेपणा संबधीं शेकडों उदाहरणें देता येतील. की, ज्यानीं आपल्या परखड विचार परंपरेनें आणि निर्भीड कर्तृत्वानें केवढी शक्ति निर्माण करून ठेवता येते. येथें एकच उदाहरण देतों तें पहा. म्हणजे वृत्तपत्राचा मोठेपणा आपोआपच कसा सिद्ध होतो तें दिसेल एकदा महाराणी व्हिक्टोरिया हिनें ग्लॅडस्टन नावाच्या एका वर्तमानपत्राच्या संपादकाला बोलावून समोर-सांगितलें कीं, "मिस्टर ग्लॅडस्टन तुम्हीं कोणाशीं बोलत आहात हें माहीत आहे ना ? ग्रेटब्रिटनची राणी आणि हिन्दुस्थानची बादशाहीण म्हणून राज्यसत्ता हातीं खेळविणाऱ्या व्हिक्टोरिया राणीशीं आपण बोलत आहात ! त्यावर ग्लॅडस्टन महाशयानीं ताडकन् अभिमानपूर्वक उत्तर दिलें कीं, होय. आपणही लक्षात ठेवा कीं, आपली राज्यसत्ता ज्या जनमताच्या सामर्थ्याच्या आधारावर टिकून आहे त्या जनतेच्या मुख्य प्रतिनिधीशीं आपण बोलत आहात. यावरून वृत्तपत्राच्या सामर्थ्याची कल्पना येते.

फ्रान्सच्या राज्यक्रांतीपासून अनेक देशातील अनेक राज्यक्रांत्याच्या उठावाकडे पहा. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य सग्रामाकडे पहा इतकेंच कशाला ? काळच्या आपल्या सयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याकडे पहा त्या त्या प्रसंगीं देशांतील नेकीनें, समाजनिष्ठेनें आणि नैतिक कर्तव्याच्या जाणिवेनें वृत्तपत्रानीं दिलेल्या विचाराद्वारें, वृत्ताद्वारें आणि विविध प्रकारच्या ज्वलत लिखाणामुळें साऱ्या देशांत कसे अंगार फुलत होते हें आपण पाहिलेंच आहे.

वर्तमानपत्राचें शास्त्र संबंधानें प्रबोधनकार ठाकरे म्हणतात. वर्तमान पत्र ही एक शास्त्र आहे. वाफ, विद्युल्लता, शक्ति, या आधुनिक युगात बलिष्ठ गणल्या

जातात. त्यांचा प्रभाव मानव निर्मित यंत्रावरच काय तो चालतो पण वर्तमान पत्र हें वाफ विद्युलतादि शक्तींना काबूत ठेवणाऱ्या मानवी प्राण्याच्या मनावर आपला अंमल गाजवितें. आज जगांत सर्व अधिभौतिक शक्तीचा सांठा मानवानीं आपल्या मुठींत ठेवला आहे खरा. पण त्या मानवानाही आपल्या मुठींत ठेवणारी व त्याच्या मनाचें पद्धतशीर प्रबोधन करून त्यावर हुकुम त्याचे नियंत्रण करणारी शक्ति आज नियत-कालिकात साठविलेली आढळेत. इतर शक्तीप्रमाणें या शक्तीचाही पुष्कळ वेळां दुरुपयोग होतो. कारण ही शक्ति स्वयभू नव्हे तिचा नियंत्रेता मनुष्यच असल्यामुळें त्याच्या गुणाची व प्रकृति भिन्नतेची बरीं वाईट कारणें त्यात शिरणें पुष्कळ वेळा क्रमयुक्त तर अनेक प्रसंगीं निसर्ग सिद्ध असतें. परंतु ही एक शक्ति आहे. जनाच्या मनोवृत्तीला हालविणारे एक जाज्वल्य सामर्थ्य आहे. आणि प्रिय हिंदुराष्ट्र व समाजाच्या वर्तमान उत्काना वास्तवाच्या बावरलेल्या दृष्टीला स्थिर करणोर व थर थर कापणाऱ्या पावलाना सावरणारी चिच्छक्ती आहे ( प्रस्थान ).

मि. डब्ल्यू टी. स्टेट म्हणतात सरकार कोण सरकार राजे सातवे एडवर्ड कीं, राजाचे दमन करणारी लोकसत्ता हेंच खरोखर खरें सरकार व वृत्तपत्रांचे सपादक हे त्या सरकारचें दरबारी आहेत जर्मन मुत्सदी बिस्मार्क म्हणतो ऱ्हाईन नदीच्या काठावर आमची जर्मन फौज ज्या प्रमाणें टेहेळणी करीत असते, त्या फौजे इतकीच हीं वर्तमानपत्रें युक्त आहेत. वर्तमान पत्राची ही पवित्र संस्था कार्लाईल्ला तर इंग्लीश चर्च इतकीच नव्हे तर अधिक योग्यतेची वाटली. वृत्तपत्र संस्थेतील खदे संपादक खरोखर शूर लेखणीबहाद्दर असे अभिमानाचे उद्गार थॅकेरेने काढले. लोकमान्य टिळक म्हणतात जेणें करून समाजाचे व्यापार सुरळीत चालण्यास मदत होईल असें लोकमत जागृत करणें त्याचें स्वरूप विष्करण करून वेळींच बंदोबस्त करणें हें वृत्तपत्राचे मुख्य कर्तव्य होय.

न. र. फाटक म्हणतात, लोकांना परिस्थितीचें ज्ञान देऊन विशिष्ट प्रगती-कारक मताचा प्रसार करण्यासाठीं वृत्तपत्राचा अवतार होता या कार्याचें प्रतिनि-धित्व प्राचीन इतिहासाकडे पाहिल्यास नारद मुनींस द्यावें लागतें. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, उन्नति व तिचे मार्ग याच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमान पत्र या सारखी अन्य भूमीच नाहीं. तसेंच ते पत्रकारासम्बंधीं म्हणतात लोकसेवेंत दीक्षित झालेल्या इसमानें लोक जागृती करितां घेतलेली स्वयशिक्षा होय ? बी. सी कांबळे म्हणतात, वर्तमानपत्र ही राष्ट्राची चौथी सत्ता व समाजाचा अर्धा मेंदू आहे. आर. डी. भंडारे म्हणतात, पत्रकार बुद्धी प्रामाणिक असावा, झुझार असावा.

लंडन टाईम्सचे संपादक मि. व्हिकर्हॅमस्टीड म्हणतात पत्रकार हे जनतेचे शिक्षक व सेवक असल्यानें त्यांचेवर मोठी जबाबदारी आहे. निर्भयता हा वृत्त पत्राचा मोठा गुण असल्यामुळें पत्रकार हा पूर्ण निर्भय वृत्तीचा असला पाहिजे. कोणत्याहि कसल्याहि भीडभाडेला बळी न पडतां त्यानें आपलीं मतें बिनदिक्कत मांडलीं पाहिजेत. प्रतिपक्षाची अगर इतरांच्या रागांची हेटाळणीची भिती बाळगता उपयोगी नाहीं. व तसें करताना आपलें पत्र विषयक धोरण अगर मताचा आग्रह आड येऊं देता कामा नये. देशप्रेम राष्ट्रीयवृत्ती व स्वातंत्र्याचें ध्येय या त्रिपुटीच्या निकषावर व्यक्ति अगर समाज आपलें प्रत्येकी वर्तन व उद्योगपरीक्षण पाहूं लागला, तर कोणालाच खालीं मान घालावयाचा प्रसंग येणार नाहीं. विचार, उच्चार व आचार हे साहजिकच शुद्ध व जोरदार होतील. तर परकीय राष्ट्रातील चिकित्सक व विचक्षण लोक आपल्या पत्रांवरून व त्यात येणाऱ्या विचारावरून आपल्या राष्ट्राच्या समाजाच्या शीलाची परीक्षा करीत आहेत अशी जाणीव आली व त्याबरोबरच राष्ट्रांच्या व समाजाच्या अब्रूची आपल्याला खरोखरच काळजी असली तर कुशब्द गैर वागणूक अगर गुलामगिरीला पोषक होणारी विचारसरणी कोण प्रसूत करील? राष्ट्रीय सामर्थ्य संवर्धन करणारें सर्व लिखाण ग्राह्य-आणि तें खच्ची करणारें सर्व त्याज्य हीच निवृत्ती. —वा. द. गोखले

अशा तऱ्हेनें थोरा मोठ्यानीं वाखाणलेली वर्तमानपत्र ही आजच्या युगाची प्रभावी तसेंच उपयुक्त संस्था आहे. अशा या वर्तमान पत्र संस्थेचा उगम आणि विकासाचा इतिहास लक्षांत येण्यासाठीं आधीं महाराष्ट्रात मराठी भाषा लेख्य स्वरूपांत श्रावणबेळगोळच्या शिलालेखापासून अस्तित्वांत असल्याचें जाणतो त्याच प्रमाणें मराठी तथा देवनागरी लिपीचा उगम इ. स. च्या आठव्या नवव्या शतकानंतरचा आहे. तत्पूर्वीच्या दोनशें तीनशें वर्षांत महाराष्ट्र आणि उत्तर हिंदुस्थानात छोटी शीरा रेखावाली नागरी लिपी चालू होती. ही लिपी पूर्ण—संस्कृत लेखनासाठीं चालू असलेल्या ब्राह्मी लिपी वरूनच झाली. या प्रमाणें भाषा व लिपींचा उगम महाराष्ट्रापुरता आपण इथें पाहिला. वस्तुतः या जगात माणूस वेद कालापासूनचें तत्कालीन ज्ञान सांकेतिक स्वरूपात ताडपत्रावर त्याचप्रमाणें भूर्ज पत्रावर मांडूं लागला. व शिष्यप्रभावळीच्या मुखोद्गताद्वारें कालप्रवाहीं ठेवूं लागला. पुढें म्हणजे इ. स. दोन हजाराचे काळांत बौद्ध व जैन वापरीत असलेल्या ब्राह्म लिपीचा शोध लागून तीच लिपि अन्य अवरणानुसार देशी भाषेत लेखन कामीं आली ती लेखन स्वरूपात इ० स० चौदाशें पर्यंत रूढ राहिली. पुढें

पंधराव्या शतकांत चीन देशात छापील मुद्राचा शोध लागला ही मुद्रणे कला चीन मधून यूरोपात गेल्यावर ती प्रगट स्वरूपात जर्मनींतील मेंझ (Mainz) या गावी १४४० त छोटा छापखाना सुरू झाला. हेंच वर्ष मुद्रण कलेचें प्रारंभ वर्ष होय.

पुढें लगेच ही कला इंग्लंडमध्यें गेली. आणि त्या आधारें कॅक्स्टननें छापण्याचें यंत्र शोधल्यानंतर शंभर वर्षांनीं ती हिंदुस्थानांत आली. प्रथम मल्याळ व तामीळ अक्षरें कोचीन मिशन छापखान्यात पाडण्यांत आलीं. नंतर १६१६ दरम्यान मराठी भाषेंत श्रीरामपूर व तंजावरला सरफोजी भोसले यांचे तर्फे पहिला मराठी ग्रंथ छापण्यात आला. डॉ. कैरे यांचे प्रयत्नामुळें आशिया खडातील देशी भाषेंत बायबलच्या प्रचारासाठीं तीस ते चाळीस देशभाषांच्या लिपी निर्माण झाल्या.

इ. स. १६१६ तजावरला मराठी प्रिंट लिपी अस्तित्वात आली खरी आणि १८३२ मध्यें मराठी १ लें वृत्तपत्र दर्पण या नावानें निघालें खरें पण मधल्या दोनशें वर्षात मुसलमानाविरुद्ध मराठे या द्वंद्वात इंग्रजाचा व मिशनऱ्यांचा म्हणावा तितका शिरकाव झाला नाहीं आणि स्वास्थ्यपूर्ण राज्य नसल्यामुळें अशा गोष्टीला या देशात अवसरही मिळाला नाहीं. परंतु पुढें १८१८ त पेशवाई नष्ट होऊन मराठी मुलुखात इंग्रज स्थिर झाले व त्याच्यातील सुधारणेचा चचुप्रवेश या भूमीवर होऊं लागला. तरी तो फार सावधगिरीचा होता. मुद्रण स्वातंत्र्यासबंधीं १८२२ मध्यें सर टॉमस मन्रो म्हणतो, येथील सगळेच लोक आमचे देशबाधव असते तर मला आत्यतिक मुद्रणस्वातत्र्य पसंत पडलें असतें. पण ज्याअर्थीं ते तसे नाहींत त्याअर्थीं त्याना मुद्रणस्वातंत्र्य देणें ही सर्वांत भयंकर गोष्ट होय. त्यामुळें उपयुक्त ज्ञानाचा फैलाव होण्याऐवजीं किंवा राज्यकारभाराची सुधारणा होण्याऐवजीं लोकात औद्धत्य बंडाळी आणि अराजकता माजण्याचा संभव आहे." अशा संशयी भीरुतेला भीक न घालता १८३६ मध्यें मेट्‌ कॉफनें मुद्रणस्वातंत्र्य या देशाला दिलेंच आणि त्याबद्दल त्याला नोकरीवरून दूर केले तरी तात्कालिन त्याचे विचार दूर दृष्टीचे होते. तो म्हणतो, मुद्रणस्वातत्र्याचा परिणाम काहीं झाला तरी ज्ञानाचे फायदे त्याना उपभोगूं देणें. हें आमचें कर्तव्य आहे. हिंदी लोकांना अज्ञानांत ठेवल्यानें तो देश आमच्या साम्राज्यात राहूं शकत असेल तर आमचें प्रभुत्व या देशाला दिलेला शापच ठरेल व त्याचा अत होणें अवश्य होईल पुढें कर्झनशाहीच्या प्रेस ॲक्ट पर्यंत व नतर मराठीमध्यें दैनिकें, द्विसाप्ताहिकें, साप्ताहिकें, पाक्षिकें, मासिकें, द्वैमासिकें, त्रैमासिक, षण्मासिक, व वार्षिक अशा विविध प्रकारांत हजारोंनीं वृत्तपत्रें निर्माण झालीं आणि मगदूराप्रमाणें टिकलीं. काहीं पत्रें बंद होत तर दुसरीं निघत असा क्रम मराठी

नियतकालिकात क्रमशः सुरूच आहे. तरीपण लोकमनावर पकड ठेवल्यांपैकीं दर्पण पत्रानंतर ज्ञानप्रकाश, प्रभाकर, ज्ञानदर्पण, उपदेशचंद्रिका, इंदुप्रकाश, वर्तमान-दीपिका, पुणें समाचार, मुंबई आखबार, ज्ञानसिंधू, ज्ञानोदय, मित्रोदय, ज्ञानचक्षू, सत्यमित्र, सूर्योदय वगैरे कितीतरी वृत्तपत्रें होत. एवढेंच नव्हे तर वर्तमानपत्रीय भरभराटीच्या काळात विचित्र आणि विक्षिप्त नावें धारण करणारीं पण वृत्तपत्रें होतीं, धुमधडाका, हंटर, भूत, चाबूकस्वार, मार्तंड, वगैरे जिल्हावार पत्राची पात्रतासुद्धा आघाडीची होती. सातारा जिल्ह्यात वीस पंचवीस वृत्तपत्रें होतीं. पुढें १८५७ च्या बंडानंतर राज्यकर्ते धर्माला अभय देऊन कारभार पाहूं लागले लोकांना जाणते करूं लागले तरीसुद्धां "चिपळुणकर, टिळक, आगरकर, परांजपे, खाडिलकर, केळकर, कोल्हटकर या मराठी वृत्तपत्र सप्तऋषींनीं राज्यकर्त्यांच्या रागा-लोभाची पर्वा न करितां मराठी वृत्तपत्राला लोककल्याणासाठीं झगडणाऱ्या लढाऊ आघाडीचें ओजस्वी स्वरूप प्राप्त करून दिलें (मराठा अग्रलेख") अशा या ऐकेक सप्तर्षींच्या तेजस्वी ताऱ्याभोवतीं लुकलुकणारीं हजारो वृत्तपत्रें निघालीं व बंद पडलीं. पुन्हां निघालीं, या क्रमानें आज मराठी पत्रकार परिषद तयार होऊन अखिल भारतीय प्रांतिक व जिल्हासंमेलनें तथा परिषदा भरतात. साहित्य समेलनात या क्षेत्रास विशेष स्थान असतें यावरून या वृत्तपत्र संस्थेची विशाल प्रगतीची कल्पना करा.

आजचें जग मुद्या-गुद्यावर-युद्धा-बुद्धावर ज्ञानाच्या जोरावर शास्त्रीय प्रगती-मुळें आलें आहे. अशा या जगातील काहीं देशातील वृत्तपत्राचीं प्रारंभ वर्षें व आजची त्याची खप निर्मितीची महान् व्याप्ती पाहिल्यास, त्यांच्या ज्ञान जिज्ञासेचें कमालीचें कौतुक वाटतें. न्युरेम्बर्ग इ० स० १४५७ निदरलँडस् १५२६, जर्मनी १६१०, अमेरिका १६९०, इंग्लंड १६२२, रशिया १७०३, हिन्दुस्थान १७८५, जपान १८६० व महाराष्ट्र १८३२ अशी ही त्याची या क्षेत्रातील सुरुवातीचीं वर्षें आहेत.

छोट्यांत छोटें पण बलाढ्य समजलेलें जपानचेंच उदाहरण पहा, १८६० सालीं जपानला सुरू झालेली पत्र संस्था १९५१ सालीं अडीच हजारावर गेली आहे. तिथल्या प्रमुख दैनिकाचा खप ४० लक्षावाहेर आहे. दीड कोट चौरस मैल क्षेत्रा-तील सव्वा आठ कोटी लोकसंख्येमध्यें अडीच हजार वृत्तपत्रात समाजशास्त्र ५०७, साहित्य ३६०, कला २८२, शास्त्र २२६ व इतर १९४ बाकी विविध अशी विभागणी आढळून येते. यावरून जागतिक प्रगत राष्ट्रें आणखी किती पुढें गेलीं असलीं पाहिजेत याची कल्पना करा.

हिंदुस्थानात इ० स० १८८५ मध्यें पहिलें वृत्तपत्र बंगाल गॅझेट या नावाचें सुरू झालें. तें इंग्रजी भाषेंत आणि या देशाला मुद्रणस्वातंत्र्यच देण्याचा प्रश्न १८३६ मध्यें निर्माण झाला. त्यावेळीं प्रचलित असलेल्या थोड्या वृत्त पत्राचे वाचक काहीं आम भारतीय नव्हते. या पाऊणशें वर्षांच्या काळात भारतात जिकडे तिकडे, दत्तक, वारसा, खालसा राज्यें, पदच्युती, बडतर्फी या गोष्टींनें इंग्रज व राजे महाराजे हैराण झालेले. अशा या द्विदलराज्यशासनांचे जनतेच्या शिक्षणावर कितपत लक्ष असणार? अर्थात अशा या काळीं निघणाऱ्या वर्तमानपत्राचे वाचक म्हणजे परदेशीय अनुकरण करणारे फॅशन म्हणून उच्च भ्रू असे सरंजारमदारच असत. हें उघड आहे. पुढें कॅ. मेकॉले शिक्षण योजनेनुसार या देशात शिक्षणाला व ज्ञानधारणेला जी चालना मिळाली, राजाराम मोहनराय, टिळक, म. फुले, लोकहितवादी न्या. रानडे याच्या सहाय्यानें सरकारनें शिक्षणांत सुधारणेचे बरेच प्रयोग केले. त्यामुळें शिक्षण क्षेत्राचें चित्र म्हणजे तत्कालीन राईचा आज पर्वत झाल्याचें वस्तुस्थितींत दिसत आहे. तरी पण ही सर्व शैक्षणिक शक्ति, नोकरी व स्वराज्य मिळविण्याची चळवळ. यातच खर्ची झाली सत्प्रवृत्त ज्ञान सुधारणा व सास्कृतिक बदल या बाबी शुक्रेदुवत् होत्या. म्हणून इतरासारखे आमूलाग्र यश मिळविणारें या देशाचें चित्र आपण पाहूं शकत नाहीं.

साडेबारा कोटी चौरस मैल भारत भूक्षेत्रावर आज ४३६४२४४२९ लोकसंख्या आहे व ७६५१ एकूण वृत्तपत्रें आहेत. त्यामध्यें जनरल ५४० दैनिक ४२०, मार्केटिंग १५०, स्कूलरिपोर्ट ६१५, फक्त इंग्रजींत १६४७ व हिंदीमध्यें १५३९ वृत्त पत्रें आढळतात. तेव्हा थोडे मागें जाऊन आढावा घेतल्यास. म्हणजे शेवटीं दाखविलेल्या परीशिष्ठामध्यें अशा प्रकारचे आकडे आढळतात. म्हणजे ठरलेली लोकसख्या दीडपट वाढली असून वृत्तपत्रें दुप्पट वाढलीं आहेत. हें किरकोळ समाधान होय शैक्षणिक प्रगती बरोबरच वर्तमानपत्राच्या वर्धमानची उपलब्ध आकडेवारी हिंदुस्थान व महाराष्ट्राच्या परिशिष्टामध्यें दिले आहेत. यावरून इतर राष्ट्राच्या मानानें या वृत्तपत्र क्षेत्रात भारताचें स्थान लक्षात येणें सोपें होईल.

'आरंभशूरा. खलु दाक्षिणात्याः' या म्हणीनुसार मराठी महाराष्ट्र बहुताशीं कल्पना योजनांचा प्रारंभ रुजविण्यांत तत्पर आहे. तसाच कांहीं निष्ठा श्रद्धामध्यें चिवट सनातन आहे. अशा या अदाजें बारा लाख चौरस मैल व्यासीवरील पावणेचार कोट लोकांच्या मराठी मुलुखावरील बौद्धिक प्रगतीची उंची जाणकार हिमाल्या एवढी मानत असले तरी व्यवहारात वर्तमान पत्र या विषयाचे दृष्टीनें पाहूं गेलों तरी आपणास फारच किरकोळ समाधान जाणवणार आहे.

पौश्चात्य इंग्रजी वाघीणीचें दूध महाराष्ट्राला भारतांत सर्वांत शेवटीं मिळालें. त्या दुधाचे गुणविशेष पचविताना या मराठीला तसे फार सायासही पडले आहेत. आज विद्वत्ता गुण कला इत्यदीमध्यें विशेषतः महाराष्ट्र उंच पातळीवरचा असला तरी मागेंच आहे. असें धाडसानें म्हणावें लागतें. जगांत पुढारलेल्या या मुलखा एवढे छोट्यात छोटे देश आज विकास वृद्धीच्या शिखरावर आहेत. आणि तो अभि-निवेश या महाराष्ट्रात असून ही प्रगतीदृष्टया हा मुलुख सर्वोत्कर्ष होण्याचे कारण म्हणजे भूमीची मशागत वरून खालीं अशी वरवरची झाली आहे एकदम खालच्या वर्गाचा थर चळवळीच्या नागरानें उफाळून वर घेऊन देशनिष्ठेच्या पाळीनें समतोल केला असता तर सांस्कृतिक समृद्धीला काय वाण ? त्याचप्रमाणें जगातील सर्व बंदर, भारतातील पहिल्या प्रतीचें शहर मुंबई, हें उद्योग धंदे, गुण, कला, विद्या साधनाचें माहेरघर म्हणून आज साडे अठ्ठेचाळीस लाख लोकवस्तीनें बृहन्मुंबई व्यास झाली आहे. या मुंबईमध्यें सुद्धां तीच परिस्थिती आहे हें परिशिष्टाच्या आकड्यांवरून लक्षात येईल.

मराठी राजांनीं तंजावरला १६१६ सालीं छापखाना आणला व पेशवाई बुडताच १८३२ मध्यें मराठींत पहिलें वृत्तपत्र निघालें. म्हणजे दोनशें वर्षांच्या काळात या छपाई चमत्काराकडे कोणाचें लक्ष नव्हतें माधुकरी तथा भिक्षुकीद्वारें पंतोजी अगर पाठशाळेंत थोरामोठ्याचीं व ब्राह्मणाचीं मुलें शिकत खालच्या वर्गास शिकविण्याकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें. उपरीनिर्दिष्टिल्या प्रमाणें इंग्रज राज्यकर्ते आपल्या नव्या सुधारणाच्या कल्पना रुजवूं लागले. पण सनातनी हट्टापोटीं त्यांनाही सबूरीनें घ्यावें लागले. १८२६ मध्यें मुद्रणस्वातंत्र्याचा प्रश्न निघाल्यावेळीं महाराष्ट्राची वरील शैक्षणिक परिस्थिती होती. पुढें ते मेकॉलेच्या शिक्षण योजनेपूर्वी व नंतर म्हणजे १८४० मध्यें या मराठी देशात ९७ शिक्षण संस्था व ५९४१ विद्यार्थी होते. यात एकही पददलित नव्हता. कारण "कुणबी भंडाऱ्यांचीं मुलें आमच्या मुला-समवेत नकोत. म्हणून एका बड्या व्यक्तीनें राज्यकर्त्यांना भीड घातली १८५२ सालीं २४५ शिक्षण संस्था व १३७५७ विद्यार्थी होते आणि या दरम्यानच धारवाडच्या महार विद्यार्थ्यास हायस्कूल मध्यें घ्यावें की नाहीं अशी विचारणा लंडन पार्लमेन्टात झाली असो. पुढें महात्मा फुले यानीं १८५२ सालीं पुण्याला भोकर वाडींत पहिली अस्पृश्याकरिता शाळा काढली. तरी सुद्धां पुढील छत्तीस वर्षें म्हणावा तसा या मुळानें जोम धरला नाहीं उलट मिशनऱ्याकडून मिळणाऱ्या शिक्षणावर तसेच तत्कालीन लष्करी पेशात तसेच बटलरादी पाश्चात्य संसर्गानें

मिळणाऱ्या ज्ञानावर जी पिढी शिकली सवरली, दाही दिशा हिंडली, फिरली, त्यांनी म. फुले, लोकहितवादी, यांचं ऐकल, वाचलं जाणलं अशी ती पहिली दलित पिढी ज्ञान, परिसानं मुक्त झाली. प्रदीप्त बनली.

इंग्रजी वाघिणीचं दूध पिवून लष्करी शिस्तीच्या कडव्या तालमींत पूरा तयार होऊन दशदिशाच्या दिग्ज्ञानानें उत्स्फूर्त होऊन या दलित पिढीचा मोहरा मातोश्री रमाबाई आंबेडकराच्या माहेर घराण्यातील महशूर गोपाळ बाबा वालंगकर यांनीं १८८८ सालीं पुण्याला विटाळविध्वंसक हें पहिलें दलितांचें पत्रक सुरू करून देव, धर्म, रूढी, परंपरा संस्कृतीला पहिली धडक मारली

महाराष्ट्र मराठी मध्यें साहित्य, शिक्षण वर्तमान पत्राच्या अढाव्या वरून या घटनेपर्यंत जी प्रगती झाली ती वरच्या वर्गाची झाली. पुढें, बाबा वालंगकरापासून ते आजदिन तागायत आम जनतेची होत आहे. हे आज हजारोवर शिक्षण संस्था व पाऊण कोट विद्यार्थी आणि अडीच हजारावर वृत्तपत्रें एवढा आमूलाग्र बदल दिसत असला तरी आज एकूण लोकसंख्येत दीडलाख लोक निरक्षर आहेत. व सोळा हजार माणसामागें एक वृत्तपत्र आहे. या वरून मराठी देश व भाषा शिक्षण व संस्कृति अजून ही किती मागें आहे हें जाणणें बेरं. यावरून मराठी बद्दल जर मन निराश होतें तर मग या देशातील सात कोटी पददलिताना ज्ञानार्जन साधन ठरणाऱ्या वृत्तपत्राची केवढी तीव्र व निकडीची गरज आहे याची कल्पना करा. आणि म्हणूनच तत्कालींन ज्ञानलालसेच्या तीव्र बडखोरीनें प्रेरित होऊन राणीच्या राज्यात गोपाळ बाबा वालगकरानीं दलितांचें पहिलें वृत्तपत्र काढलें. म्हणजे हेंच आमच्या या क्षेत्राचें प्रारंभवर्ष होय. तेव्हा दलित समाजांतील वर्तमानपत्राची भारतांतील प्रारंभवर्षें पाहूं जातां, पुणें १८८८, मुंबई १९०९, कोल्हापूर १९२६, नागपूर १९१०, जळगाव १९३८, धुळें १९४१, वर्धा १९४५, ठाणें १९५५, लखनौ १९५६, सोलापूर १९५८, कानपूर १९४५, अहमदाबाद १९४६, मद्रास १९४४, कलकत्ता १९४६, निपाणी १९४७, अजमेर १९६०, दिल्ली १९५९, अमरावती १९२०, अलिगढ १९६०, अकोला १९६१ अशीं हीं प्रारंभवर्षें असलीं तरी विशेषतः पुणें, मुंबई, नागपूर, या ठिकाणींच जास्त वृत्तपत्रें निघालीं

ज्ञानाचा मार्ग बंद केलेला हा समाज वर्तमानपत्र या क्षेत्रांत कस कसा जास्त वृद्धिंगत होत गेला हें वरील कालगणनें वरून समजेलच. पण या आधीं वृत्त पत्र माहात्म्य व डॉ बाबासाहेब आंबेडकराची इच्छा लक्षांत घेतल्यास या समाजास या क्षेत्रातील अजून कैक पल्ल्याची वाटचाल करावयाची आहे हें विसरता उपयोगी नाहीं.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वर्तमानपत्रासंबंधींचे विचार

## प्रकरण दुसरें

काय करूं आतां धरूनिया भीड ।
निःशंक हें तोंड वाजविलें ॥
नव्हे जगीं कोणी मुकियांचा जाण ।
सार्थक लाजून नव्हे हित ॥ तुकाराम ॥

"शनिवार दि. ३१-१-१९२० च्या" मूकनायकाच्या पहिल्या अंकीं वरील बिरुदावली देऊन संपादकीय मनोगतामध्यें डॉ साहेब म्हणतात, "आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढें होणाऱ्या अन्यायावर उपाय योजना सुचविण्यास तसेंच त्याची भावी उन्नति व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्र यासारखी अन्य भूमीच नाहीं. परंतु मुंबई इलाख्यांत निघत असलेल्या वृत्तपत्राकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, त्यातील बरींचशीं पत्रें विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारीं आहेत. इतर जातींच्या हिताची पर्वा त्यांना नसते. इतकेंच नव्हे तर केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेहि त्यातून प्रलाप निघतात अशा वृत्तपत्रकारांना आमचा इशारा एवढाच आहे कीं, कोणतीहि एखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातीस बसल्याशिवाय राहणार नाहीं समाज ही एक नौकाच आहे. ज्याप्रमाणें आगबोटींत प्रवास करणाऱ्या उतारूनें जाणून बुजून इतरांचें नुकसान करावें म्हणून म्हणा त्याची त्रेधा कशी उडते ही गमत पाहण्यासाठीं म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळें म्हणा जर का इतराचे खोलीस छिद्र पाडलें तर सर्व बोटीबरोबर त्यालाहि आधीं किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याप्रमाणें एका जातीचें नुकसान केल्यानें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेंही नुकसान होणार, यात बिलकूल शंका नाहीं. म्हणून स्वहितसाधूपत्रानीं इतरांचें नुकसान करून आपलें हित करावयाचें पढतमूर्खांचें लक्षण शिकूं नये. हा बुद्धीवाद ज्यांना कबूल आहे अशीं वर्तमानपत्रें निघालीं हें सुदैव म्हणावयाचें. दिनमित्र, जागरूक, डेक्कन रयत, विजयी मराठा, ज्ञानप्रकाश, हिंदु प्रकाश, व सुबोधपत्रिका, वगैरे पत्रातून बहिष्कृत समाजाच्या प्रश्नांची चर्चा वारवार होते परंतु ब्राह्मणेतर या आवडत्या संज्ञेखालीं मोडत असलेल्या अनेक जातींच्या प्रश्नाचा त्यात खल होतो; त्यात बहिष्कृताच्या प्रश्नाचा सांगोपांग ऊहापोह

ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों दि ........................

होण्यास पुरेशी जागा मिळणें शक्य नाहीं हें ही पण उघड आहे. त्याच्या अतिबिकट स्थितीशीं सलग्न असलेल्या प्रश्नाची वाटाघाट करावयास एक स्वतंत्र पत्र पाहिजे हें कोणीही कबूल करील. ही उणीव भरून काढण्यासाठीं या पत्राचा जन्म आहे. खास अस्पृश्यांच्या हिताची चर्चा करण्यासाठीं 'सोमवंशीय मित्र' 'हिंद नागरिक' व 'विटाळ विध्वंसक' हीं पत्रें उपजली व लयहीं पावलीं. परन्तु वर्गणीदाराकडून योग्य प्रोत्साहन मिळत गेल्यास "मूकनायक" न डगमगता स्वजनोद्धाराचें महत् कार्य करणारास योग्य पंथ दाखवील असें आश्वासन देतांना ते अनुभवातीं खोटें ठरणार नाहीं अशी खात्री बाळगून हें स्वयश निवेदन आटोपतें घेतों."

या अंकांतच अस्पृश्य समाजाच्या आकांक्षाबद्दलचे त्याचे विचार मननीय आहेत. बाबासाहेब लिहितात, "जर या हिंदुस्थान देशांतील सृष्ट पदार्थांच्या व मानव जातीच्या चित्रपटाकडे प्रेक्षक या नात्यानें पाहिलें तर हा देश म्हणजे केवळ विषमतेचें माहेर घर आहे असे निःसंशय दिसेल.

हिंदु समाज हा एक मनोरा आहे. एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला होय पण लक्षात ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे कीं '—या मनोऱ्यास शिडी नाहीं आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाहीं. ज्या मजल्यात ज्यानी जन्मावें त्याच मजल्यांत त्यानीं मरावें. खालच्या मजल्यातला इसम मग तो कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यांत प्रवेश नाहीं. वरच्या मजल्यातला माणूस कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्रज्ञा नाहीं.. .. .. हिंदुधर्मशास्त्र म्हणजे उदात्त विचार व नीच आचार यातील विरोधाचे कोडेंच म्हणायचें ...सत्ता व ज्ञान नसल्यामुळें ब्राह्मणेतर व मागासलेले याची उन्नति खुंटली आहे. दौर्बल्य, दारिद्र्य व अज्ञान या त्रिवेणी संगमांत हा अफाट बहिष्कृत समाज वाहवला आहे, हें खास. दीर्घकाल अंगीं मुरलेल्या दास्यामुळें उद्भवलेली हीनता त्याना मागें खेंचीत आहे. ती स्थिती योग्य आहे, यापेक्षां बरी स्थिती आपल्या नशीबीं नाहीं अशा समजूतीचा विघातपणा ह्या पतितांच्या नजरेस आणण्यास ज्ञानासारखें अंजन नाहीं".

या वरून डॉ. साहेब 'मुकीं बिचारीं कुणीं हाका' अशा अज्ञ दलिताना ज्ञानाजन देण्यास प्रथम उत्सुक होते त्यासाठीं त्यांना वर्तमानपत्रासारखी भूमि हवी होती. ती त्यानी कोल्हापूरच्या शाहू महाराजाच्या मदतीनें साध्य करून "मूकनायक" पत्रक सुरू केलें तें पुढें बंद पडल्यावर ५–६ वर्षांनीं म्हणजे रविवार दि. ३–४–२७ रोजीं "बहिष्कृत भारत" हें पाक्षिक सुरू केलें. या संबंधीं श्री. खैरमोडे, आंबेडकर चरित्र खंड २ मध्यें म्हणतात—वर्तमानपत्र काढण्याचें मुक्रर केल्या नंतर

साहेबानी मराठी भाषेचा हिंदुस्थानांतील सामाजिक व धार्मिक सुधारणच्या चळवळीचा अभ्यास करण्याचें ठरविलें. मुकुंदराय, मुक्तेश्वर, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास इत्यादि संताचें वाङ्मय, केसरी, ज्ञानप्रकाश, सदेश, चित्रमयजगत्, विविध ज्ञानविस्तार मनोरंजन इत्यादि वर्तमानपत्रें व मासिकें; निबंधमाला, आगरकराचे व केसरींतील निवडक लेखाचे ग्रंथ आणि ह. ना. आपटे, गडकरी, खाडिलकर, केळकर, कोल्हटकर, वेरकर इत्यादि साहित्यिकाचीं पुस्तकें विकत घेऊन त्याचा अभ्यास पाच सात महिन्यात केला. बहिष्कृत भारत सुरू झाल्यानंतर त्यानीं प्रत्येक अंक उत्तम निघावा याबद्दल फार काळजी घेतली. त्याच्या लेखांत गभीर विचार, प्रौढ व शुद्ध मराठ मोळ्या घाटणीची भाषा, समाज क्रातीबद्दलची ज्वलत तळमळ प्रतिपक्षावर कठोर प्रहार, आणि तर्कशुद्ध विवचन व निवेदन पद्धति हे सद्गुण पहावयास मिळतात".

बहिष्कृत भारत पत्रावर पुढें कर्ज झालें. कारण अपुरे वर्गणीदार. कांहीं वर्गणीदारांनीं पैसे धाडले नाहींत वर्गणीदारात काही समंजस होते त्यापैकी मायणी ता. खटाव जि. सातान्याचे रहिवासी ज्योतिबा द्वारकू झोडगे हे एक होते जे बेफिकीर वर्गणीदार होते त्याचा साहेबानीं ३-२-२८ च्या अंकात "बहिष्कृत भारतचे ऋण हें लौकिकीऋण नव्हे काय ?" या अग्रलेखात भरपूर समाचार घेतला. परंतु सुप्रसिद्ध क्रिकेटपटू बाळू बाबाजी पालवणकर याच्या शिवाय कोणींही या सूचनेचा विचार केला नाहीं.

'आमच्या खट्याळ व नाठाळ वर्गणीदारानीं व इतर आश्रयदात्यानीं लक्षात ठेवावयास पाहिजे कीं ब. भा. ची सपादकी ही इतर पत्रांच्या संपादकीप्रमाणें पैसे कमविण्याचा धंदा नसून ही लोकजागृतीकरतां घेतलेली स्वयशिक्षा होय. अशा लोकसेवेंत दीक्षित झालेल्या इसमानें काढलेल्या पत्रास काटेकोरपणानें वागविणें अनुदारपणाचें आहे.

याच अग्रलेखात साहेबानीं स्वतःचा स्वार्थत्याग, घोलप यानीं मुकनायकाच्या प्रकरणात त्याच्यावर टीका करताना त्याच्या दैन्याबद्दल काढलेले उद्गार आणि आईसाहेब रमाबाई यानीं ससारात काढलेल्या कष्टाबद्दल खालीलप्रमाणें उद्गार काढले. बाबासाहेब लिहितात—ब. भा च्या संपादकास अथवा व्यवस्थापकास त्यांनीं जी दगदग सोसली व जी मेहनत घेतली त्याबद्दल त्याना एका पैचाही मोबदला देण्यात आलेला नाहीं. ब भा. च्या सपादकास मदत करण्यास दुय्यम संपादक ठेवण्याइतकी पत्राची सापत्तिक स्थिति नव्हती. तसेंच बिनमोली संपादकीय काम करण्यास स्वार्थत्यागी असा अस्पृश्यातील माणूसही लाभला नाहीं ब. भा. च्या

संपादकाच्या प्रौढ लिखाणास दबून गेल्यामुळें म्हणा किंवा सार्वजनिक कार्याविषयीं वरचढ वाटली असल्यामुळें म्हणा बाहेरच्या लेखकांचा त्यास मिळावा तितका पाठिंबा मिळाला नाहीं. अशा स्थितींत ब. भा. चे २४-२४ रकाने लिहून काढण्याची सारी जबाबदारी एकट्या संपादकास घ्याची लागली. प्रस्तुतच्या लेखकानें जेवढा स्वार्थत्याग करणें त्यास शक्य होतें तेवढा त्याग त्यानें केला आहे. तो कांहीं संस्थानिक नाहीं किंवा जहागिरदारही नाहीं रानांत नाहीं शेत व गांवात नाहीं घर असें त्याच्यासंबधी एकानें केलेलें विधान सत्य आहे. काहीं झालें तरी म्हणण्यासारखी द्रव्यानुकूलता नसता, इंग्रज सरकारने देऊं केलेली द. म. २॥ हजार रु. ची नोकरी त्यानें नाकारली. वकिलीसारख्या स्पृश्य लोकांवर अवलंबून असणाऱ्या धंद्यात विशेष किफायत मिळण्याची आशा नसताही केवळ समाजकार्यी मोकळीक असावी म्हणून त्याने तो पत्करला आहे. रूढ धर्माचारातील व लोकाचारातील दोषांचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर कार्य हाती घेतलें असल्यामुळें धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्राकडून होत असलेल्या शिव्याचा व शापांचा भडिमार तो एकसारखा सोशीत आहे मतांचें मंडण व तदनुसार वर्तन करण्याचें त्यानें ठरविल्यामुळें स्पृश्य वर्गांतील आपल्या फार दिवसांच्या मित्राचा दीर्घ रोष त्यानें आपणावर घेतला आहे व तेणेंकरून त्याच्या हातून त्याच्या धंद्यात त्यास मिळूं शकणाऱ्या मदतीस तो दुरावला आहे. कवडीचा फायदा नसताना त्यानें एक वर्षाच्या आत ब. भा चे बऱ्या वाईट रीतीने रकाने भरून काढून लोकजागृतीचें काम केलें, व तें करतांना त्यानें आपल्या प्रकृतीकडे, सुखाकडे, चैनीकडे व ऐषआरामाकडे न पाहता डोळ्याच्या वाती केल्या. इतकेंच नव्हे तर प्रस्तुत लेखक परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपचाची काळजी वाहिली व जिला अजूनहि वाहावी लागत आहे व तो परत आल्यानंतर त्याच्या विपन्न दशेंत दिवस काढलेत, अशा ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात २४ तासातून अर्धा तासही त्याला घालविता येत नाही. प्रस्तुतच्या लेखकानें जो स्वार्थत्याग केला आहे त्यात त्याने विशेष काहीं केलें आहे असें नाहीं व प्रस्तुतचा लेखक तसें कांही म्हणतही नाहीं. उलट ज्या परमेश्वराने त्यास एका अस्पृश्य जातींत जन्मास घालून हा मानवोद्धाराच्या मंगल कार्यांत आपला देह झिजविण्याची जी त्यास संधी दिली हे त्याच्यावर मोठे उपकार झाले. तथापि त्याचें म्हणणे असें आहे की हरेक अस्पृश्य माणसावर जो लौकिक ऋणाचा बोजा जन्मतःच पडलेला आहे, त्या ऋणाची जाणीव प्रस्तुतच्या लेखकास पूर्णपणे आहे व त्याने समाजकार्याप्रीत्यर्थ जे

काही केले आहे ते त्याच्यावर असलेल्या लौकिक ऋणाची थोडीबहुत फेड करावी या भावनेनेंच केलें आहे. त्याची इतकीच अपेक्षा आहे कीं, त्याच्या इतर अस्पृश्य बंधूंनीही लौकिकी ऋणाची बूज ठेवावी. ब. भा. चे कार्य एकट्याचे तर नाहीच 'दस की लकडी एक का बोजा' झाला तरच ते तडीस जाईल. महाराष्ट्रात १० जिल्हे आहेत त्यात प्रत्येकीं ८–१० तालुके व प्रत्येक तालुक्यात ७०–८० गांवें आहेत. दरेक गांवाने थोडे पैसे दिले तर पन्नास हजार रुपये जमा होतील व त्यातून ब. भा. च्या छापखान्याच्या योजनेस चालना मिळेल व वृत्तपत्र अखंडपणें चालू राहील.' अशी साहेबानी या अग्रलेखात विचारसरणी माडली होती. तरी सुद्धा सहकार्य लाभले नाही व ब. भा. बद करणे बाबासाहेबाना भाग पडले.

बाबासाहेबांनी मूकनायकाची स्वयंशिक्षा—घोलप व त्याच्या वितुष्टता-पत्क-रून शिवाय सदर पत्र सातारा रोडला घोलपानीं ठाकरे तर्फे सुरू केलें, तें बंद झालें. हें सर्व जाणून आणि बहिष्कृत भारताची पद्धतशीर उभारणी करून सुद्धां वैफल्य पत्करावें लागले. तरीसुद्धा त्यांनी १९२८ मध्ये देवराव नाईकाना सपादक नेमून 'समता' पत्र सुरू केलेंच या काळातच छापील मजकूराच्या अब्रुनुकसानभरपाईची प्रकरणें त्याचेभोवती होतीच. ती म्हणजे देवरूखकराच्या 'बहिष्कृत भारतमित्र' या पत्राला १०० रु. दंड भरावयास लागला; रा. ब. बोले, अच्युतराव कोल्हटकरावर अब्रुनुकसानीची फिर्याद करण्यास प्रवृत्त झाले असताना त्याना "सार्वजनिक चळ-वळींत पडलेल्या माणसाने आपले मन बळकट केले पाहिजे. ( Social work is thankless task )" हे सागून परावृत्त केले. 'तसेच देशाचे दुष्मन' व 'इडिया अँड चायना' चे ले. स्पॅट यांचे केसीसला त्यानी सहकार्य दिले. पुढे अन्य अनेक सामाजिक, राजकीय कार्याला तोंड देत त्यांनीं दि. ३०–११–२९ रोजीं 'जनता' नावाचे साप्ताहिक सुरू केले व त्यासाठीं त्यानीं 'भारत भूषण प्रिंटींग प्रेस' ची पण व्यवस्था करून दिली. जनता पत्र क्रमशः चालू होतें. मध्यंतरी युद्धामुळें कागद मिळेना म्हणून तें काहीं काळ बंद पडले, ते पुन्हा सुरू झाले व जातीय दग्यांत प्रेस जाळला गेला त्यावेळीं काही काळ ते बंद पडून मग इमारत फडाच्या जागेंत प्रेस उभारून तें सुरू केले. धर्मांतर व पक्षाचे नामातर या गोष्टी जुळून येण्याचे वेळेसच त्यानी जनता पत्राचे 'प्रबुद्ध भारत' असे खास नामाभिधान ठेवलें ते पत्र नियमित सुरू आहे.

त्यावेळीं मध्येच कोणी असा उद्योग करीत असेल तर ते साहेबाना खपत नसे भाऊराव गायकवाडना लिहिलेल्या ६–७–३० पत्रात साहेब म्हणतातः पतित पावन दासबुवा 'पतित पावन' नावाचे वृत्तपत्र सुरू करणार असल्याच्या अफवा ऐकतो.

ही खरीच वस्तुस्थिति आहे काय ? हे जर खरे असेल तर माझ्या मतें ही दुर्दैवी घटना आहे, तरी त्याला वेळींच पायबंद घातला पाहिजे. अशा स्वतंत्र वेगळ्या कार्यपद्धतीच्या मार्गानें ब्राह्मणेतर पक्षाचें कसें नुकसान झालें याची नोंद आपण घेतली पाहिजे. पतितपावनदास किंवा तुमच्यापैकीं कोणीही वृत्तपत्र चालवूं शकता, तर 'बहिष्कृत भारत' कां चालवीत नाहीं ? लोकास असें वाटेल कीं, मला सर्व चळवळीचें केंद्रीकरण करावयाचें आहे, परंतु एकजूटींतच सर्व सुरक्षितता आहे असें मला वाटतें, त्यास माझा नाइलाज आहे.

तसेंच जनता पत्र बंद असताना तें सुरू करण्याची कल्पना भाऊराव गायकवाडानीं बाबासाहेबांना कळविली. त्याजबरोबर नाशिकला काहीं उत्साही मंडळी दुसरें पत्र काढणार आहेत त्याबद्दलचा विचार कळवा अशी अपेक्षा केली होती म्हणून दि. २६-१०-४३ ला दिल्लीहून पाठविलेल्या पत्रात साहेब म्हणतात— आपलें साप्ताहिक जनता पत्रक सुरू करावें. या योजनेबाबत तुमचें पत्र पोहोंचलें आपल्यातील काहीं उत्साही तरुणाची हें पत्रक चालविण्याची तयारी पाहून आनंद वाटला. आपल्या साप्ताहिक पत्रक चालविण्याच्या कामांत मला इतके अनुभव आहेत कीं, त्यामुळें अधिक काळजीपूर्वक पाऊल टाकण्यास मी शिकलों आहें. उगीच फाजील उत्साह असणें बरें नाहीं. पत्रक चालविणें तशी सोपी गोष्ट नाहीं त्यात पैशाचा एक मोठा प्रश्न असतो. दुसरी गोष्ट पत्रकाचा दर्जा साभाळून पत्रक अधिक दर्जेदार व वाचकाचे दृष्टीनें आकर्षक करणें हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. पैशाच्या प्रश्नाचा मी विचार करीत नाहीं कारण त्याची जबाबदारी मजवर पडत नाहीं. परंतु दुसऱ्या प्रश्नाबद्दल मला अधिक काळजी वाटते. आपल्या साप्ताहिकाचा (पत्रकाचा) संपादक कोण होणार ? त्याची पात्रता काय आहे ? हे महत्त्वाचे प्रश्न माझ्यापुढें आहेत. यावर आपण काहींच लिहिलें नाहीं. ही माहिती जोंपर्यंत मला मिळत नाहीं तोंपर्यंत मी आपल्या योजनेला संमति देऊ शकत नाहीं. नांवाबद्दल मीं कांहीं विचार केला नाहीं 'कैवारी' किंवा त्यासारखें पत्रकाचें काहीं नाव असावें असें मला मान्य नाहीं."

एवढ्या दक्षतेनें बाबासाहेब सहकाऱ्याच्या विचारानी ठरलेलें कार्य अंगीकारत. कोणाही उत्साही माणसानं नवी कल्पना ठेवली तर ठरलेल्या कामाव्यतिरिक्त ते तिचा विचार करीत नसत. एकदा श्री. खैरमोडे यानी साहेबाना चळवळीला पोषक अशा ग्रंथमालेची कल्पना सांगितली तों साहेब उत्तरले, "अरे! साप्ताहिक चालविणें जिथें मुष्किलीचें आहे तिथें तुझ्या ग्रंथमालेला कोण विचारतो ?" एवढें ते समाजमनाच्या

उदासीनतेवर रुष्ट होते. म्हणून 'घार हिंडे आकाशीं, लक्ष तिचें पिलापाशीं' यासारखे आपल्या चळवळीच्या साध्य साधनाची काळजी वाहत.

'जनता' पत्रावर त्याचे अमर्याद प्रेम होतें. दूर दिल्ली किंवा लडनला असले तरी पत्राच्या व्यवस्थेकडे लक्ष होतें.

लडनहून भाऊराव गायकवाडाना पाठविलेल्या पत्रात ते म्हणतात, 'जनता पत्रासाठीं लिखाण करण्यासाठीं मी माझी सर्व शक्ति एकवटण्याचें ठरविलें आहे. येथें घडणाऱ्या सर्व घटना नियमितपणें मी जनता पत्राला लिहीत आहें. जनता पत्राचा खप वाढविण्यासाठीं प्रचारकार्यास तुम्ही मदत करा . ..'.

किती तरी दिवसा नंतर ते म्हणतात, 'दुसरी एक हितगुजाची गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहें. जनता पत्रासाठीं ट्रस्ट असावा असें मला वाटतें. जनतेला काही तूट आली तर ती या ट्रस्टच्या पैशातून भरून काढता यावी. आपल्याला वर्तमानपत्राची अत्यंत जरूरी आहे. आपल्यावर होणारे जोरजुलूम आणि गाऱ्हाणीं जनतेला कळविण्यासाठीं आपल्याला जनता पत्र चालविणें आवश्यक आहे. (दामोदर हॉलमधील भाषण दि. १४–७–५२.)

इतकेंच नव्हे तर येवला धर्मांतर परिषदेचें आधीं डॉ. बाबासाहेबांनीं काहीं निष्ठावत त्यागी पण तळमळीचे प्रचारक नेमले होते. हे प्रचारक खास गावोगाव फिरून पक्षाचे सभासद करीत. 'मुक्ति कोण पथें' 'विसाव्या शतकांतील गुलामगिरी' व इतर पदावली विकत. शिवाय जनता पत्राचे वर्गणीदार वाढवीत यासाठीं त्यांचेजवळ पावती बुकें असत. त्याना कोणाचा अडथळा, संशय व प्रतिबंध होऊं नये म्हणून त्याना शिफारसपत्रें देण्याची व्यवस्था केली होती. अशाच पैकीं सातारा जिल्ह्यातील मौजे महिमानगडचे आंधळे कलावंत श्री. भडकनाथ मोरे याना त्यानीं पितळेची तळहाताएवढी बॅज दिली होती. तिच्यावर छापलें होतें,

स्वतंत्र मजूर पक्ष प्रचारक

श्री. शिवराम भाऊ ऊर्फ भडकनाथ मोरे महिमागडकर, जि. सातारा.

आ.—भीमराव रामजी आंबेडकर बार-ॲट लॉ.

आणि हेच भडकनाथ माझे गावीं आले म्हणजे कोंकण, सातारा, कोल्हापूर दौऱ्यातील सर्व रिपोर्ट व हिशोब माझे वडील श्री. श्रीरंग रामजी रणपिसे याचे सुंदर हस्ताक्षरांत, पक्षाचा वेगळा व पत्राचा वेगळा असा मुंबईला पाठवीत. त्याच्या

किती तरी रसीदा, पावत्या व अंक मी स्वतः त्याचे पडके घरदुरुस्ती प्रसंगी पाहिल्या आहेत अशा प्रचारकांच्या हालचाली जनतेच्या अंकातून प्रसिद्ध होत.

अशा प्रकारें बाबासाहेबानीं स्वतःच्या लेटरहेड्वर स्वदस्तूरचें सर्टीफिकेट दि. ४-७-१९२७ रोजीं श्री. शंकरदास नारायणदास चितेगावकर यांना उत्तर महाराष्ट्र व नागपूरभाग प्रचारास्तव दिलें. तर भोर संस्थानचे निष्ठावत कार्यकर्ते श्री. रामभाऊ मिस्त्री ( अड्सुळ ) याना १९२८ सालीं पुणें जिल्हा प्रचारास्तव प्रमाणपत्र दिलें होतें. या तऱ्हेनें कितीतरी विश्वासू कार्यकर्त्यांना बॅजेस, शिफारशी, व प्रमाणपत्रें देऊन त्या भागाचा प्रचार सोईचा पडेल अशी अज्ञ जनतेच्या सोईनुसार प्रचारयंत्रणा त्यानीं खास योजून अंमलांत आणली होती.

यावरून बाबासाहेबांनीं आपल्या वर्तमानपत्रांची आईच्या हृदयानें काळजी घेतली व्यवस्था ठेवली, जोपासना केली हें उघड आहे.

बाबासाहेबानीं वृत्तपत्रास्तव हा एवढा खटाटोप व त्रास कशासाठीं घेतला? तर भल्याभल्याना जेरीस आणणाऱ्या वृत्तपत्रीय पहेलवानाच्या आखाड्यांत आपलाहि जिद्दी पहेलवान असला पाहिजे, त्याच्या दराऱ्यानें समाजाचें संरक्षण झालें पाहिजे, अस्मिता उचावली पाहिजे हें उघड होय. कारण इतर वृत्तपत्रांनीं बाबा-साहेबाना फार त्रास दिला होता. त्याना डिवचलं होतं म्हणून ते बहुतेक सभें-तून वृत्तपत्रासंबंधानें उपरोधिक वक्तव्य केल्याशिवाय रहात नसत. ते समाजाला उद्देशून म्हणत, “ झगडा, आणखी झगडा. त्यागाच्या दिव्यांतून गेल्याशिवाय दलित समाजाला तरणोपाय नाहीं ”. “ शासनकर्ती जमात बनणें हेंच आमचें ध्येय आहे ” “ तुम्ही वाघासारखे बना, म्हणजे तुमच्या वाटेला कोणीं जाणार नाहीं. ” अस्पृश्य समाज इतर कोणत्याहि समाजापेक्षा अधिक राजकारणज्ञानी समाज आहे याबद्दल मला बिलकूल शंका नाहीं. कोणत्याहि समाजाची उन्नति त्या समाजाच्या शिक्षणावर अवलंबून आहे. राजकारणाइतकेंच महत्त्व शिक्षणसंस्थेला आहे. एखाद्या समाजाची उन्नति त्या समाजांतील बुद्धिमान, होतकरू व उत्साही तरुणांच्या हातीं असते. ”

आणि असे तरुण प्रचलित समाजप्रवाहात पुढें न आल्यामुळें त्यांना एकट्यानांच इतर गोष्टीला तोंड तर द्यावें लागलेंच पण वृत्तपत्रीय गावील माशांचें मोहोळ पण परतवावें लागलें. बाबासाहेब म्हणतात, “ वर्तमानपत्रातून आमचीं व्यंगचित्रें येत, बातमीदार येत नसत, बातमी छापीत नसत. बरें तरी आता

येतात. पूर्वी हाका मारल्या तरी येत नसत. मी 'बहिष्कृत भारता'चा १९१९ ते १९४२ पर्यंत मी संपादक होतों. एकदां केसरीला जाहिरात पाठविली. त्याबरोबर जाहिरातीचें बील रु. ३ ची मनिऑर्डरही केली पण परत आली. कारण जागा नाहीं म्हणून. 'टाइम्स ऑफ इंडिया'ला फोन केला त्याना वाटलं कुठलीं हीं भिकारडीं त्रास द्यायला लागलीं त्याचें उत्तर नाहीं आणि आता सारखे पाठीमागें लागतात रिपोर्ट द्या म्हणून. ही अशी परिस्थिति. इतक्या थराला आमची चळवळ गेली आहे " ( दि १८–१०–५४ )

" अस्पृश्यांच्या बातमींना विशेष जागा न देणाऱ्या वर्तमानपत्रात कालच्या टोलेजंग मिरवणूकीबद्दलची बातमीहि मला वाचावयाला मिळाली. आपण केलेली प्रगति प्रशंसनीय आहे. " ( दिल्ली दि. २०–५–५१ )

डॉ. बाबासाहेबानीं बौद्धधर्माची भूमिका विशद करण्यास सुरवात केल्या- नंतर इतर वृत्तपत्रातून बऱ्याच टीका, विकृत बातम्या व असभाव्य तर्क कुतर्क प्रसिद्ध होऊं लागले त्यासंबंधींचा समाचार डॉ साहेबानीं घेतला. त्यापैकींच्या काहीं भाषणातून बाबासाहेब वृत्तपत्रासबधीं जे कांहीं बोलले ते किती दूरदर्शीपणाचे, अचूक विधानाचे विरोचित पण समयोचित समर्थनाचें द्योतक असे प्रभावी उद्गार होते.

रावळी कँप दि. ३–६–५३ च्या भाषणात बाबासाहेब म्हणतात, " परवा दि. २७–५–५३ रोजीं आपण मोठ्या प्रमाणावर बुद्धजयंती साजरी केली. वास्तविक आपण ही एक मोठी चांगली गोष्ट केली असें मला वाटतें. परतु काहीं वर्तमानपत्रानी या गोष्टीला विपरीत स्वरूप दिलें. जेथें ३० हजार लोक होते तेथें ३ हजार लोक होते असें आमच्या बाबतींत डोळ्यांवर कातडे ओढलेल्या वर्तमानपत्रानीं ठोकून दिलें. काहींनी तर बुद्धजयतीच्या बातमीला आपल्या वर्तमानपत्रात थाराच दिला नाहीं. हें त्याचें नेहमीचेंच आहे. डॉ. आंबेडकरांचें कार्य म्हटलें कीं एक तर त्याला प्रसिद्धीच द्यावयाची नाहीं आणि प्रसिद्धी दिलीच तर त्या कार्याला गौणत्व तरी आणावयाचें किंवा विपरीत स्वरूप तरी द्यावयाचें. बुद्धजयंतीवर वर्तमान- पत्रांत जी टीका आली आहे त्या टीकेला समर्पक व सविस्तर उत्तर मी देणार आहें. या वर्तमानपत्रात आलेल्या टीकेचा तुमच्यावर मात्र विपरीत परिणाम होऊं देऊं नका. मी तुम्हाला जें काहीं सांगतों आहें, तें अगोदर तुम्हीं नीट समजाऊन घ्या व मगच त्यावर विश्वास ठेवावयाचा किंवा नाहीं ते ठरवा,

वर्तमानपत्रात एक पाढा नेहमीं म्हटला जातो कीं, 'काही जरी केलं तरी अस्पृश्यता जाऊं शकत नाहीं, राजकारणानें म्हणा किंवा धर्मकारणानें म्हणा अस्पृ-

श्यता जाणार नाहीं', अशा लोकाना माझ्याबरोबर चर्चा करावयाची असल्यास माझी तयारी आहे. हे लोक उगजत आधळे आहेत असें मला वाटतें, सर्व वर्तमानपत्रें माझ्यावर टीका करतात, मात्र त्याची मला पर्वा वाटत नाहीं, त्याच्या टीकेमुळें माझें वजन घटेल असें समजण्याचें कारण नाहीं. मी दर वर्षाला पाहतों तों माझें वजन वाढतच आहे."

वरळी दि. १०–१–५५ च्या सभेंत म्हणतात, "बुद्धधर्माची प्रतिस्थापना पाहून बऱ्याच लोकानीं कोल्हे कुई सुरू केली आहे. वर्तमानपत्रातून ओरड केली; पण मला आताच त्याचेकडे पाहावयास वेळ नाहीं, एकदा सर्वांचें लिखाण होऊन जाऊ दे, माझ्या विरुद्ध कोण कोण काय लिहितात हें बघू त्यांची लेखणी बंद झाली म्हणजे मी माझी लेखणी उचलीन,"

नरेपार्क दि. २४–मे, १९५६ च्या भाषणांत बाबासाहेब म्हणतात, "आज १ महिना मी मुंबईंत आहें, मुबईचीं वर्तमानपत्रें मी वाचतों, कोणी तरी माझेकडे कटिंग ही पाठवीत असतो, बौद्धधर्म स्वीकारण्याबद्दल अनेक लोकाचीं मतें वाचायला मिळतात. किमानपक्षी सर्व वर्तमानपत्रातून टीका येते, अस्पृश्य लोक कार्याला उद्युक्त झालेले आहेत. त्याच्या अज्ञानाचा हा फायदा घेऊन त्याना बहकविण्याचा प्रयत्न करितात. तुम्ही बौद्ध धर्म स्वीकारल्यानें तुमचें नुकसान होईल; डॉ. आंबेडकर वेडा आहे; त्याच्या मागें लागूं नका, तुम्ही खड्ड्यांत पडाल. अशी ते टीका करतात. सार्वजनिक कार्यांत टीका करण्याचा अधिकार सर्वांना आहे, याचा मला खेद वाटला अशातला भाग नाहीं. माझा जन्म दुसऱ्याची टीका सहन करण्यात गेला. ज्याप्रमाणे लहान पोराला त्याची आई दृष्ट लागू नये म्हणून काजळ लावते त्याप्रमाणे हे लोक मला नेहमीं काजळ लावतात, या कृत्याचें मला विशेष काहीं वाटत नाहीं."

"आपल्यातील पुष्कळसे लोक अज्ञानी व काही सज्ञानी आहेत. त्याच्यावर वर्तमानपत्रातल्या लिखाणाचा परिणाम होत असेल त्या लिखाणाचा परामर्ष घेणें अगत्याचें आहे तथापि मला एक गोष्ट सागावयाची आहे कीं, टीका करण्याचा अधिकार कोणाचा? कोणी कोणावर टीका करावयाची? ज्याला आमचा उद्धार व्हावासा वाटतो त्यालाच टीका करण्याचा अधिकार असतो जीव घेणाराला, मारणाराला अधिकार नाहीं."

पुढें त्यानीं भ. बुद्ध व देवदत्तानें शिकारींत बळी पडलेल्या पक्षाच्या संबंधानें झालेल्या संवादाचें उदाहरण देऊन ते म्हणतात, "जो रक्षण करतो तो धनी. हीच

नीति खरी आहे. म्हणून मला पत्रकर्त्यांना असें विचारावयाचें आहे कीं, तुम्ही आमचे रक्षणकर्ते कीं मारते ? तुम्ही आहात तरी कोण ? हजारो वर्षे आम्ही तुमच्या समाजांत वावरत आलों. कोणी तरी पुढें येऊन सांगावें कीं, अस्पृश्यासाठीं या गोष्टी केल्या. अस्पृश्याच्या उद्धारासाठीं ज्यानी करंगळीसुद्धा वरती केली नाही त्याना टीका करण्याचा काय अधिकार ? ह्या लोकाना माझें असें सागणें आहे कीं, तुम्ही तोंड गप्प करून बसा. आम्हाला खड्डयात पडायचें असलें तर पडूं. तुम्ही इतके दिवस आम्हाला खड्डयात टाकलेंत. आता ते स्वातंत्र्य आम्हास द्या, खड्डयात पडण्याचा अधिकार, चुका करण्याचा अधिकार आम्हाला द्या, त्यानी अस्पृश्य पोराला विलायतेला पाठविलं आहे काय ? त्याना ह्या ज्या स्कॉलरशिप्स मिळत आहेत त्या मी सागून मिळविल्या आहेत. ह्या पडीक जमिनी त्यानी स्वखुषीनें दिल्या आहेत काय ? आम्ही आमच्या पायावर उभे राहूं, हिंदूंनी आमच्या साठीं काय केलें ? त्यानीं एकच सुधारणा केली ती म्हणजे रेल्वेमध्यें जातांना ते आमच्या डब्यामध्ये बसतात, ते ही माहित नसते म्हणून."

अशा प्रकारें डॉ. आंबेडकराचे वर्तमानपत्रासंबंधीचे विचार आणखी कितीतरी जास्त व विशेष आहेत, परन्तु विस्तारभयास्तव या विषयापुरतेच वरील सर्व लक्षात घेतां "जगातील थोर पत्रकार डॉ. आंबेडकर" हा एक त्याच्या जीवन आयुष्याचा पैलू केवढ्या प्रभावानें उठून दिसत आहे, हे विचारवंतानीं लक्षात घेणें जरूरीचें आहे.

# दलित समाजाचें वृत्तपत्र शतक.

## प्रकरण ३ रें.

समाजनिष्ठेच्या प्रेरणेनें आणि स्वातंत्र्याच्या चळवळींतून महाराष्ट्र समाजातील निरनिराळे थर देशस्वातंत्र्य आणि स्वजनोन्नतीचें भव्य स्वप्न रेखाटित होते. पाऊणशें वर्षांपूर्वींचा तो काळ महात्मा फुल्यांच्या कर्तृत्वानें पावन झालेला दलित समाज अज्ञानाच्या अंधःकारांतून ज्ञानाची नवी दृष्टि घेऊन हळूहळू पुढें चालला होता. आपल्या व्यथित मनाच्या सामाजिक अन्यायाची दुःखद कहाणी आपल्या बांधवाना आणि या देशातील सप्रदायवादी कर्मठ्या शिष्ट समाजाला सागण्यास तो सरसावला होता. ती कहाणी सागण्याचीं साधनें तो शोधूं लागला त्यात त्याला आपलें मनोगत व्यक्त करण्याचें “ वृत्तपत्र ” हें साधन निर्माण करावें लागलें. त्यातून स्वजनाच्या उद्धाराच्या पैलतीरावर पोहोंचण्याकरिता वाटेंत परकीय राजवट आणि आग्रही सनातनी समाज यांच्या दोन मोठ्या डगरी आडव्या होत्या ! त्या पार करून जाण्याकरिता वृत्तपत्राच्या शिडीनें चढून आपल्या लेखणीच्या शस्त्राचा हल्ला करण्याचें कार्य त्याला आपल्या हातीं घ्यावें लागलें !

दलित समाजाच्या चळवळीच्या पाउणशें वर्षांच्या कालखंडात वर्तमानपत्राचें शतक पुरें केलें आहे. अर्थात् या वर्तमानपत्राकडे इतिहासकारानीं डोळेझाक केली आहे ! त्यामुळें लोकाना ही माहिती समजणें कठीण आहे !

### पाऊणशें वर्षांतील वृत्तपत्र शतक

### १८८८ ते १९६१

महाराष्ट्राच्या दृष्टीनें विचार करता १८२२ सालीं मुद्रणकला सुरू झाली. मराठी भाषेतील सुप्रसिद्ध केसरी–मराठा, हीं पत्रकें १८८१ सालीं सुरू झालीं. त्यानंतर सात आठ वर्षांनीं म्हणजे १८८८ सालीं दलिताच्या “ विटाळ विध्वंसक ” ह्या पहिल्यावहिल्या मासिक वर्तमानपत्राचा जन्म झाला. गोपाळबाबा वालंगकर हे त्या वृत्तपत्राचे संपादक होते दलित समाजाच्या वृत्तपत्रीय इतिहासात पहिला मानाचा मुजरा गोपाळबाबा वालंगकराना करावा लगेल १८८८ सालीं प्रसिद्ध झालेल्या “ विटाळ विध्वंसक ” ह्या वृत्तपत्राचा पहिला क्रमाक मानला. १९६१ सालीं साहित्य, कला, संस्कृति आणि इतिहास या प्रमुख ध्येयाना वाहिलेल्या “प्रज्ञा” मासिकानें दलित समाजाच्या वृत्तपत्राचें शतक पुरें केलें आहे !

वरील पाऊणशें वर्षांच्या कालातील एकूण जीं वृत्तपत्रें निघालीं त्याचा येथें टप्प्या टप्प्यानें विचार करूं या —

92332

"विटाळ विध्वंसक" १८८८ या सालापासून पुढील तीस वर्षांतील वृत्तपत्राकडे दृष्टि टाकतां १९४० सालपर्यंतचीं—हीं वृत्तपत्रें मोठ्या जोमानें आणि तडफेनें सुरू झालीं. त्यानीं लोकांच्या मनांत चांगलाच आदर निर्माण केला. हा काळ म्हणजे प्रत्यक्ष महात्मा ज्योतिबा फुल्याचा काळ होता. या काळात नागपूरचे कि. फा, बनसोडे यानी सुरू केलेलीं "मराठा दीनबधु", "हिम्मत बहादूर", "चोखामेळा" "हिंदनागरिक" आणि "मजदूर पत्रिका" हीं पत्रें कृष्णराव भालेराव आणि मुकुंदराव पाटील (पुणें) याचे "दीन मित्र" जयसिंग विठ्ठल नवले (पुणें) याचे "दीनबधु" शिवराम जानबा काबळे याचे "सोमवंशीय मित्र" बळवत कृष्ण पिसाळ याचे "विश्वबंधु" हीं वृत्तपत्रें चाललीं होतीं. याच काळात दलित समाजाचे उद्धारक आणि बहुजन समाजाचे अध्वर्यू महात्मा ज्योतीबा फुले यानीं आपल्या सिद्धहस्त लेखणीनें आणि प्रखर समाजनिष्ठेनें "सत्यशोधक" व "दीनबंधु" ह्या वृत्तपत्रानीं अखिल महाराष्ट्रातील हट्टी सनातन्याच्या मगरमिठीचा पीळ सैल करून त्यावर वज्र प्रहार करून समाजधारणेवर, धर्मांधतेवर, जातीयतेवर आणि खुळया देवदेवतावर सपासप कोरडे ओढले; आणि त्याचाच परिपाक म्हणून कीं काय इतिहास प्रसिद्ध ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद प्रसिद्ध असलेला दिसतो. या एकूण तीस वर्षांत प्रसिद्ध झालेलीं दलित समाजाचीं बरींच वृत्तपत्रें कमालीचीं लोकप्रिय आणि यशस्वी झालीं. या सर्व वृत्तपत्राचा उद्देश आणि हेतू सामाजिक शिक्षण हाच होता. दलित अस्पृश्याना सामाजिक न्याय मिळावा आणि त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाची दखल घेण्यात यावी,—हीच कैफियत सागताना सनातनीं, शिष्टसमाजास कडक भाषेंत आणि परकीय ब्रिटीश सरकारास कृतज्ञतेच्या भाषेंत वृत्तपत्राद्वारें करण्यात येत होती.

## दहा वर्षांचा काळ. १९२० ते १९३०

पुढील दहा वर्षांचा काळ दलित समाजाच्या ऐतिहासिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आणि प्रखर असा आहे! यापूर्वींच्या वृत्तपत्राचा दृष्टिकोन केवळ सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणेचा होता, पण त्या पुढील दहा वर्षांच्या काळानें त्यात राजकीय चळवळीला आणि लढ्याला स्थान दिल्यानें दलित समाजाच्या जीवनाचे अंतरंग अधिक स्पष्ट होऊं लागलें. हजारों वर्षांपासून ज्ञानाची मक्तेदारी घेऊन बसलेल्या ब्राह्मणी विकृत ज्ञानाचा वडवानल युगानुयुगें दलित समाजमन जाळून त्याचे कोळसे झालेल्या त्या अज्ञान राखेच्या ढिगावर ठिय्या मारून बसला होता. अशा स्थितींतून गलितगात्र झालेल्या दलित समाजाच्या जीवनस्वातंत्र्याच्या आणि मूलभूत हक्कासाठीं दलितांचे एकमेव कैवारी आणि भारतीय दलिताचे महान् पुढारी

...ाठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... ... ... वि:
क्रमांक ... ... नों वि:

पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानीं स्वतःच " बहिष्कृत भारत ", " मूकनायक " आणि "समता" हीं ज्वलंजहाल पत्रकें सुरू केलीं त्या पत्रातील दलित समाजाच्या जीवन प्रश्नाचें डॉ. आंबेडकराच्या प्रखर लेखनातील लोकमताचे सिंहनाद व त्या नादाचे पडसाद सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर पसरलेल्या अटारपटार दऱ्याखोऱ्यादि घळी-ओघळीच्या तसेंच खोल घनदाट, उंच मुलुखयाच्या प्रदेशावरून झंजावाती वाऱ्याप्रमाणें फिरू लागलें, संचारूं लागलें डॉ. आंबेडकराची लेखणी संपूर्ण बुद्धिवादी आणि प्रखर समाजनिष्ठेच्या भात्यातून तयार झालेली होती. त्यानीं अलम दुनियेत आपलें बुद्धिवादी व्यक्तित्व सिद्ध करून आपल्या सव्यसाची लेखणीनें अखिल वाचक विश्व प्रदीप्त केलें होतें. त्यानीं आपल्या लेखणीच्या क्रांतितेजानें अस्पृश्य पददलिताच्या नव्या मनूचें अभिनव दर्शन घडविलें इतकेंच नव्हे तर गुलामास माणूसकीचा साक्षात्कार प्रत्यक्षात करून आपलें हिमालयाएवढें कर्तृत्व करून ठेवलें ! ! डॉ आंबेडकराच्या पत्रातून दलित समाजाचे सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक असे सारे प्रश्न हाताळले जात होते. डॉ. आंबेडकराच्या वृत्तपत्राचें त्यांचे सहकारी म्हणून पांडुरंग नंदराम मटकर, ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप हेहि होते.

१९२० ते १९३० या दहा वर्षांच्या काळात पू. डॉ. आंबेडकराशिवाय इतरहि लोक वृत्तपत्रें चालवीत होते. हीं वृत्तपत्रें आपला स्वतंत्र दृष्टिकोन मांडीत होतीं. मात्र दलित समाजाचें हित पहाणें हाच त्याचा मूळ हेतू होता. त्यात शंकर मास्तराचा " भारत ", बी. जी देवरुखकर याचें " बहिष्कृत मित्र ", जयसिंग विठ्ठल नवले यांचे पुण्याहून निघणारें " दीनमित्र ", श्री. घोलप याचे " सारथी " शिवराम जानबा कांबळे (पुणें) याचे "आदिहिंदु", महादेव आबाजी कांबळे (मुंबई) याचें " आत्मोद्धार " गणेश अक्काजी गवई (अमरावती) याचे "बहिष्कृत भारत" श्री. दा. ना. पटवर्धन यांचें "अस्पृश्यता निवारण" डॉ. मोरे यांचें "नवजीवन" दा. म. शिर्के (कोल्हापूर) याचें " गरूड " हीं वृत्तपत्रें निघालीं. त्यात पाटील-घोलप यांचें " बहिष्कृत मित्र " "सारथी" शिवराम जानबा कांबळे यांचे "भारत" आणि दा. म. शिर्के याचें "गरूड" साप्ताहिक यानी दलिताच्या वृत्तपत्रीय क्षेत्रात चांगलीच कामगिरी केली. त्या पत्रानीं सामाजिक प्रश्नाना वाचा फोडून आपलें कर्तव्य फार चांगल्या तऱ्हेनें पार पाडलें.

## १९३० ते १९५० पर्यंतचा काळ

पुढील १९३० ते १९५० पर्यंतच्या दलिताच्या वृत्तपत्राचा आराखडा देताना दलित समाजाच्या सामाजिक सुधारणेंत जी जी स्थित्यतरें होत होतीं त्या बरहुकूम वृत्तपत्राचें ध्येय आणि हेतूहि बदलत होते; ही गोष्ट प्रामुख्यानें ध्यानी

घेणें जरूर आहे ! दलित समाजाच्या वृत्तपत्राच्या सुरवातीच्या १८८८ ते १९२० सालपर्यंतच्या काळातील दृष्टिकोन केवळ सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणा करणें हाच होता. पण पुढील (१९२० ते १९५०) तीस वर्षांच्या काळात दलिताच्या सर्वांगीण जीवनाचे प्रश्न वृत्तपत्रात प्रकट होऊं लागले. ह्या काळात एकूण जी वृत्तपत्रें चालली त्यातील महत्त्वाच्या वृत्तपत्राचा येथें आढावा घेऊं या :—

कि. फा. बनसोडे यांचें "चोखामेळा", बाबू एल् एन् हरदास (नागपूर) यांचें "महारठ्ठा" गो. ना. काळे (वर्धा) याचें "मराठी हरिजन" आणि शं. ब. भोंसले (कोल्हापूर) यांचें "लोकसेवक" हीं वृत्तपत्रें साधारणतःच चाललीं. त्यात त्याना हवें तेवढें यश मिळूं शकलें नाहीं. मात्र पुढें सुरू झालेलीं दि. मा. खैरकरांचें "सिद्धार्थ" पत्र चांगलेंच गाजलें. श्री. नाशिकराव तिरपुडे याच्या "अरुण" साप्ताहिकानें सामाजिक चळवळीचें चागलेंच विचार मंथन केलें. श्री. खैरकराच्या "सिद्धार्थानें" आणि श्री. तिरपुडे याच्या "अरुणनें" नव्या कल्पना आणि नवी दृष्टि हे दोन गुण वृत्तपत्रीय जीवनात आणले. त्याचप्रमाणें नागपूरच्या ना. रा. शेंडे यानीं श्री. ग. त्र्यं. माडखोलकर याचेसह "पूजा" मासिक सुरू केलें, त्यात त्यानीं सामाजिक विचाराबरोबरच साहित्य आणि कला याचा प्रामुख्यानें पुरस्कार करून सखोल विचार आणि मार्मिकता हे विशेष गुण घेऊन तें मासिक यशस्वी केलें. सुरेश ससारे (मुंबई) यानीं सुरू केलेलें "जयभीम" साप्ताहिक हेंहि एक लोकप्रिय आणि सुदर विचारानीं नटलेलें म्हणून त्याची प्रसिद्धी होती. त्याचप्रमाणें मिंढे पाटील याचा "मराठा" हें एक अतिशय तळमळीनें चालविलेलें साप्ताहिक होतें. डॉ. आंबेडकर स्कूल ऑन्ड पॉलिटिक्स तर्फे निघालेला "मराठा" चा विशेषाक अतिशय नमुनेदार आणि सग्रही ठेवण्यासारखा असा होता. श्री वसंत वाटोळे यानीं काढलेले "उद्धार" मासिक हें हरिजनाच्या प्रश्नाची चिकित्सा करणारें होतें.

## १९५० ते १९६१ पर्यंतचा काळ

आता पुढील काळात म्हणजे १९५० पासून १९६१ पर्यंतच्या १०।११ वर्षांतील दलित समाजाच्या वृत्तपत्राचा विचार करता वृत्तपत्रातील संख्येचें प्रमाण जसें वाढत होतें, तसेंच त्याच्या वाचकाचें प्रमाणहि वाढत होतें, हें ओघानेंच आलें. त्यानीं आपल्या जीवनाचे प्रश्न आणि ते सोडविण्याचे मार्ग सांगणारे आपले विचार मार्गदर्शक या स्वरूपांत व्यक्त केलें या वेळीं वृत्तपत्रीय जीवनात अधिक उधान आलेलें दिसतें. हा काळ म्हणजे परकीय राजवट जाऊन स्वातंत्र्याचा काळ होय. त्यामुळें आपल्याच लोकाचें सरकार असल्यानें आपलीं गाऱ्हाणीं आणि अडचणी

ते ऐकतील या हेतूनें अनेक सूज्ञ मंडळी आपले विचार आणि प्रश्न आपल्या वर्तमान पत्रातून बोलून दाखवू लागले. या दहा वर्षांच्या काळांत महाराष्ट्रात आणि इतर प्रांतांत मिळून पचावन्न ते साठ वर्तमान पत्रें निर्माण झालीं त्यापैकीं काही आजतागायत सुरू आहेत. आणि पुन्हा कांही नवी वृत्तपत्रें निर्माण होत आहेत; त्यापैकीं प्रमुख पत्राचा येथें थोडक्यात विचार करूं या !

१९५० सालीं श्री आर्. डी. भंडारे यांनी "निर्धार" साप्ताहिक पत्र सुरू करून त्यात सडेतोड विचार आणि प्रतिपक्षावर हल्ला चढविण्याचें तंत्र चांगलें अवगत केलें श्री बा. शि वाभळे याचें "सिद्धार्थ" साप्ताहिक नामदेव व्हटकर याचे "नजर" मासिक" आणि श्री. आप्पा रणपिसे आणि टी. पी. अडसूळ यांचें "भीमगर्जना" हें पाक्षिक, ही वृत्तपत्रें आपली अल्पशी चुणूक दाखवून बंद पडली

सामाजिक, धार्मिक आणि पौराणिक गोष्टींसाठीं गाडगेबाबा मिशनतर्फे दलित अपंगासाठीं "जनता जनार्दन" ह्या मासिकानें फार चागली आणि बहुमोल काम-गिरी केली आहे. आजहि तें मासिक चागल्या प्रकारें चालत असून महाराष्ट्रातील थोर विचारवतानी आपले दलितासंबंधी विचार आणि भावना प्रकट केल्या आहेत.

त्यानंतर १९५५ सालीं डॉ बाबासाहेब आंबेडकरानी पूर्वीं सुरू केलेल्या "जनता" पत्राचें नामाभिधान बदलून त्याचें "प्रबुद्ध भारत" असे नाव ठेवण्यात आलें ह्या साप्ताहिक पत्राचे संपादक म्हणून पहिल्यापासून भा. र. कद्रेकर, देवराव नाईक, श्री. सहस्रबुद्धे, श्री आर् डी भंडारे श्री. बी. सी कांबळे, श्री मुकुंदराव आंबेडकर, श्री. यशवंतराव आंबेडकर, श्री. दा. ता. रूपवते, श्री शंकरराव खरात आणि आता पुन्हा श्री. भा र. कद्रेकर इत्यादींनी आपआपल्या विचारानीं आणि शैलीनें तें साप्ताहिक यशस्वी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे ! महाराष्ट्रात दलित समाजाचें हें एक सुप्रसिद्ध आणि यशस्वी साप्ताहिक असून त्याचें लोण महाराष्ट्राच्या कानाकोप-ऱ्यांत पोहोंचलें आहे. राजकीय, सामाजिक, इत्यादि साऱ्या विचाराचा ऊहापोह या साप्ताहिकांत वेळोवेळीं चांगल्या तऱ्हेनें केलेला आढळतो.

केवळ धार्मिक विषयाला वाहिलेल्या वर्तमानपत्राची संख्या पधरा वीस तरी भरेल. त्यापैकीं काहीं प्रमुख पत्राचा येथें विचार करू—प्रा. के एन्. भागवत (मुंबई) याचें "धर्मचक्र" श्री. सिद्धार्थकुमार शहाणे (नागपूर) याचें "धर्मदीप" श्री. रमेश महादेव मेश्राम (नागपूर) याचें "बोधिसत्व" श्री. भिक्कू प्रज्ञानंद (लखनौ) यांचें "मध्यम मार्ग" (हिंदी) श्री का. वि संवादकर आणि श्री कद्रेकर याच्या संपादकत्वा-खालीं चालत असलेलें महाबोधी सोसायटी ऑफ इन्डियाचें "धर्मयान" श्री वि. रा.

रणपिसे ( पुणें ) यांचे "बोधिसत्व" श्री. राहुल सुमन छावरा (अजमेर) यांचें " सम्यक् दृष्टि " ( हिंदी ) मासिक इत्यादि वृत्तपत्रें चांगल्या प्रकारें चालली होतीं व काहीं आजही चालत आहेत. धार्मिक विचाराचा प्रचार आणि प्रसार करण्याचें कार्य हीं वृत्तपत्रें करीत असून आपापल्या परीनें त्या विचारांचें लोण समाजापर्यंत पोहोंचविण्याचे त्यांचे प्रयत्न यशस्वी होत असल्याचें दिसत आहे. त्यामुळें धार्मिक गोष्टी समजून घेण्याची जागृतीहि त्या पत्रानीं लोकमतात निर्माण केली आहे.

पुढील दोनचार वर्षांत बरींच वर्तमानपत्रें, मासिकें आणि साप्ताहिकें या स्वरूपात निर्माण झालीं आणि लवकरच बंदही पडलीं त्यात " भीमयुग " "समशेर" " युगपुरुष " ( मुंबई ), " भीमज्योति " ( धुळें ), " बुद्धसंदेश " ( सोलापूर ), " बौद्धमित्र " ( नागपूर ), " भीमवाणी " ( कल्याण ), " सत्यशोधक " ( मुंबई ), " दलितोद्धार " ( वर्धा ), " समता " ( नागपूर ), " मूकनायक " ( मुंबई ), " जनक्रांति " ( सातारा), " उत्थान" ( दिल्ली ), हीं वर्तमानपत्रें अल्पायुषी ठरलीं.

राजकीय आणि सामाजिक विषयाला प्रामुख्यानें वाहिलेलें खासदार बी सी. कांबळे यानीं १९५९ सालीं मुंबईत सुरू केलेलें " रिपब्लिकन " साप्ताहिक आपल्या परखड विचारानीं राजकीय घडामोडीच्या चलत आणि ज्वलत प्रश्नाचें सडेतोडपणें विश्लेषण शैलीदार लेखणीनें करून तें साप्ताहिक त्यानीं बरेंच यशस्वी केलें आहे!

नव्यानें सुरू झालेल्या वृत्तपत्रात तथागत ( धार्मिक मासिक ) ( अकोला ) " विद्यार्थी जगत " ( मुंबई ), — विद्यार्थ्यांचें त्रैमासिक सोशिअल रिफार्म— ( Social Reform ) पुणें—( इंग्रजी ), " सिद्धार्थ जगत् " ( नागपूर ), हीं वृत्तपत्रें आहेत मुंबईत सुरू झालेलें सध्याचें दलित समाजाच्या वृत्तपत्राचें शतक ( शंभरी ) पुरें करणारें महाराष्ट्र बौद्धसाहित्य परिषदेचें मुखपत्र " प्रज्ञा " हें वृत्तपत्र दलिताचें निर्भेळ साहित्य, कला, सस्कृति आणि इतिहास याला वाहिलेल्या वृत्तपत्रात दलिताच्या दृष्टीनें हें वृत्तपत्र पहिलेंच मानावें लागेल! दलिताच्या वाङ्मयाचा आणि लोकसाहित्याचा सखोल अभ्यास करीत असलेले तरुण लेखक जनार्दन वाघमारे हे या " प्रज्ञा " वृत्तपत्राचे मुख्य संपादक आहेत. त्यांना सहकारी म्हणून मी आणि भाऊसाहेब आडसूळ हे आहोत. महाराष्ट्रातील तमाम दलित समाजाच्या जाणत्या आणि नव्या पिढीतील तरुणाना हे " प्रज्ञा " वृत्तपत्र अत्यंत आवडू लागल्याचें दिसतें.

अशा तऱ्हेनें दलित समाजाच्या वृत्तपत्रानीं गेल्या पाऊणशें वर्षांत शतक पुरें केलें आहे!

# पत्रक्षेत्रांतील सापत्नभाव आणि दलितांचें कर्तव्य !

## प्रकरण ४ थें.

### वैचारिक अंतःप्रवाह.

"स्वातन्त्र्य हा अर्थात् संस्कृतीचा आत्मा आहे. आणि या स्वातंत्र्याची परिस्थिति काय आहे ते तान्त्रिक आहे कीं मान्त्रिक आहे (की यांत्रिक आहे) ते एकांगी आहे कीं सर्वांगीण आहे हें वृत्तपत्राच्या संख्येवरून आणि स्वरूपावरून अजमावणें शक्य आहे. याचें एक महत्त्वाचें कारण मला असें वाटतें कीं वैचारिक लढाई पुकारणें ही वृत्तव्यवसायाची एक महत्त्वाची प्रेरणा आहे, व वृत्तपत्रें म्हणजे नुसती माहिती पत्रकें नव्हेत तशीं तीं असती तर सरकारी माहिती खात्याच्या पत्रकानीं वृत्तपत्रावर मात केली असती.

समाजामध्यें जे अंतःप्रवाह सारखे सुरू असतात त्याची, वृत्तपत्रें ही वैचारीक अग्रदूत असतात. ज्या समाजांत या वैचारीक अतःप्रवाहाचे झरे आटले त्याचे चैतन्य हारपण्यास आणि गतिमानता नष्ट होण्यास सुरवात झाली असें म्हणावयास काहीहि हरकत नाहीं." (१२ व्या पत्रकार परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात प्रभाकर पाध्ये याचे उद्‌गार)

आज भारत देशात बहुविध भाषेत हजारोनी वृत्तपत्रें असून त्यांचे अनेक लक्षावधी वाचक आहेत हीं सर्व वृत्तपत्रें कुठल्याना कुठल्या अतःप्रवाहानें प्रेरीत होऊन ह्या प्रवाहातर्गत पक्ष पथ संस्थाच्या पुरस्काराखालीं चालू असतात. देशातील विशिष्ट घडामोडीच्या यशापयशाचे श्रेय हीं पत्रें व पक्ष पथ संस्था घेतात हें उघड आहे.

### अंतःप्रवाहांतील क्रांतिचक्र.

राजकारणाच्या दृष्टीनें या देशाला स्वातंत्र्य मिळविण्याच्या ज्या चळवळी झाल्या, त्याचा मुख्य प्रवाह कॉंग्रेस पक्षप्रणीत चळवळीचा होय आणि ते तसे श्रेय घेतातच. तसेंच समाजवादी समाज रचना, मार्क्स वाद, लोकशाही, वगैरे संबंधींच्या चळवळीचे अंतःप्रवाह आज प्रवाही आहेत. तरी पण एका निराळ्याच चिच्छक्तीनें आमूलाग्र क्रांतिकार्य परिपूर्ण केलें व देशाची शान उत्तुंग ठेवली. हें विशेषत्व जाणण्यास जिज्ञासूनीं डॉ. आंबेडकराची चळवळ सूक्ष्मपणें पहावी. त्याच्या प्रत्येक श्वासानें व दृष्टीक्षेपानें चैतन्य स्फुलिंग फुलल्याची व काया पालट झाल्याची घटना घडली आहे.

"काँग्रेस म्हणते की, परकीय सत्तेला हाकलून देऊन आम्ही क्रांती केली, याबद्दल त्याना धन्यवाद. परंतु ही अर्धवट क्रांति होय. खरी लोकशाही निर्माण करावयाची असल्यास आज हजारो वर्षे डोक्यावर नाचत आलेला वरचा वर्ग खाली व समाजातील खालचा वर्ग वर गेल्याशिवाय खरी क्रांती होणार नाहीं. क्रांतीचें चक्र अर्धेच फिरलें. आसासह चाक पूर्ण फिरल्याशिवाय खरी क्रांतिच होऊ शकत नाहीं. ते चाक आम्हीच फिरवूं" असें म्हणणाऱ्या डॉ. आंबेडकरांनीं जी परिवर्तनीय उत्क्रांती केली ती भारतभर चळवळ करून केली. त्या चळवळीच्या अंतःप्रवाहाच्या प्रेरणेचे अग्रदूत—वृत्तपत्रें. काँग्रेस किंवा इतर चळवळीच्या मानानें बाबासाहेबाच्या वाट्याला फार कमी होते, तरीसुद्धां त्यानीं गुलामाला गुलामीची जाणीव करून देऊन त्याना परिस्थितीविरुद्ध बंड करण्यास उद्युक्त केलें, तुम्हीं वाघासारखे बना म्हणजे तुमच्या वाटेला कोणी जाणार नाहीं". झगडा आणखी झगडा त्यागाच्या दिव्यातून गेल्याशिवाय, समाजाला तरणोपाय नाही" अशा तऱ्हेच्या मुक्तीसग्रामी सूक्तानी समाज सतत चैतन्यदायी ठेवून अहर्निश कार्य केलें. याशिवाय राज्य शासनावर "धर्मचक्रप्रवर्तनाय" असे चपखल कोरून मानवतेचं अशोक चक्र दिगंत सन्मानित ठेवल आणि आत्मविश्वासपूर्वक घोषित केलें की मी, "सारा भारत बौद्धमय करीन", तसेच पक्षाचे नाव रिपब्लिकन ठेवून या देशातील राष्ट्रीयत्वाच्या आस्मितेस उद्युक्त केलें. हें सर्व कशाच्या बळावर ? तर स्वतः डॉक्टरसाहेबच एके ठिकाणीं म्हणतात, "अस्पृश्य समाज इतर समाजापेक्षां अधिक राजकारणज्ञानी समाज आहे. याबद्दल मला बिलकूल शंका नाहीं". असा हा राजकारणज्ञानी समाज म्हणजे आजचा बौद्ध समाज आसहिंदुस्थानव्यास त्याच्या कृतज्ञतेनं भारावून गेला. श्रद्धेनं भीमभाविक राहिला. म्हणून त्याना सारा भारत बौद्धमय करण्याचा—रिपब्लिकनमय करण्याचा जबर आत्मविश्वास राहिला. असा अस्पृश्य व बौद्ध समाज एका हाकेसरशी ओ देण्यास सघटीतपणें जादूसारखा धांवत येतो. या बाबतची अंतःप्रेरणा जागृत करणारी या समाजाची जी अनेक साधने आहेत त्यापैकीं हातावर मोजण्याइतकी आज निघणारी उद्या बंद होणारी पुन्हा निघणारी अशीं वृत्तपत्रें होत.

म्हणजे बऱ्याच अंतःप्रवाहाच्या सघटीत स्वरूपाच्या काँग्रेस या महानदाचें कार्य करणारी हजारो वृत्तपत्रें लाखो वाचक, सुसज्ज यंत्रणा पाहिल्यास आणि दलित समाज व डॉ. आंबेडकराच्या एकाकी झुंकाडीला प्रमाणीत पत्राची साथ, कमी वाचकाची सगत व बेमालूम गैर सोय लक्षात घेतल्यास, या देशाच्या चळवळीचा

भन्नाट घोंघावत वहाणाऱ्या प्रचंड प्रपातामधून विरुद्ध प्रवाहाने वहाणारी ही भीम झुळकाडी विश्वविजयी झाल्याचे अपूर्व प्रत्यंतर काळाला आदर्शनिय असें आहे.

अशा तऱ्हेच्या अपूर्व संग्रामाचे अग्रदूत तथा वर्तमानपत्रे या क्षेत्रांतील पत्रकार, टिकाकार, लेखक यांचा एवढा मोठा वर्ग वाढला आहे की त्याच्यात सुद्धा अनेक मोठ्या संस्था आहेत.

मराठी पत्रकार परीषद, इंडीयन व ईस्टर्न न्यूज पेपर सोसायटी, ऑडीट ब्यूरो-अँड सरक्युलेशन, लँग्वेज न्यूजपेपर एडीटर्स कॉन्फरन्स अशा एका मागून एक संस्था निर्माण झाल्या बातमीदाराच्या एवढेच नव्हे तर वर्तमानपत्र या विषयावर भले मोठे जाडे ग्रंथ सांप्रत निर्माण झाले आहेत. अशा ग्रंथकर्त्यांनी वृत्तपत्राच्या या इतिहासकारानी जागतीक ते प्रांतीक पातळीवरील यथास्थित समालोचने दिलीं, त्यामध्यें वरील क्रांती आदर्शांची दखल घेतली असेल तर ती किती किरकोळ देतात. याचा नमुना म्हणून श्री. रा. गो. कानेड लिखीत मराठी नियतकालीकांचा इतिहास यामध्ये ते म्हणतातः—

"ब्राह्मणादी पुढारलेल्या जातीकडून होणाऱ्या सामाजीक जुलूमाचा निषेध करण्यासाठी 'दिनमित्र' निघत आहे श्री. पाटील तरवडी या गावी कित्येक वर्षे झिज सोसून ते चालवितात. दुसरे पत्र वा. रा. कोठारीच 'जागरूक' बा. भ. पाळेकराचे 'जागृती' देसाई याच 'राष्ट्रविर' नंतर कोल्हापूरला 'विजयी' मराठा गरीबाचा 'कैवारी मजूर' पुणे या वृत्त पत्राची कामगीरी असलेल्या जातीत अभिनव जागृती करण्याच्या दिशेने जरी नैतिक स्वरूपाची असली तरी त्याने लोक जागृतीच कार्य फारच मोठ केले आहे या व्यतिरीक्त 'गरूड' व 'दलित बंधू' यांची फक्त सूची दिली आहे.

'मुकनायक,' 'बहिष्कृतभारत,' 'समता,' 'जनता,' हीं डॉ. आंबेडकराची पत्रे या इतिहासकारस आढळली नाहींत, हे आश्चर्यकारक नवल नव्हे काय? नव्यानेच प्रसिद्ध झालेल्या श्री. जोशी लेले याच्या वृत्तपत्र इतिहासात दलिताच्या क्षेत्राचा अणुमात्र उल्लेख नाही. त्याच प्रमाणे पत्रकार परीषदेची १५ अधिवेशने भरली. त्याच्या वृत्तपत्रीय प्रदर्शनांत आंबेडकरी पत्रे नसतातच पण अध्यक्ष स्वागाध्यक्षाच्या भाषणात या क्षेत्राचा सुतराम संबंध आणला जात नाही. किंवा ठरावांत या बाबीची जाणीव ठेवली जात नाही. याशिवाय जुन्या आठवणी पाहिल्यास 'केसरी' पत्राला स्वतः बाबासाहेबानी बिलासह जाहिरात पाठविली, ती

स्वीकारली तर नाहीच पण केसरी प्रबोधसारख्या मोठ्या ग्रंथात केसरी संबंधीत सर्व विषयाचा परामर्श घेतला पण डॉ. आंबेडकर व दलित समाजाचा त्यात उल्लेख नाही

कोणत्याहि नवीन निघणाऱ्या वर्तमान पत्राच्या पहिल्या अंकातील संपादकीया-मध्यें महाराष्ट्रांतील किरकोळ पत्रकारांचें–पुढाऱ्याचें स्मरणपूर्वक अभिवादन केलें जातें. इतराना समाधानीं ठेवण्याइतपत दखल मानली जाते. याचा नमुना पाहिल्यास रमेश राणे संपादीत 'कोकण पत्राच्या' १ ल्या अंकी अग्रलेखात 'कोकण रत्नागरातील रत्नाची त्यानी विपुल खैरात उधळली नव्हे, वाचकाना लयलूट केली. पण त्याना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे रत्न दिसू शकलं नाही हें किंतवें आश्चर्य मानावें ? चैत्य भूमिजवळच्या तुकाराम कृपेमधून दादा चौधरी मानवी समता प्रसिद्ध करतात त्याना दि. ६ डिसेंबरचा माणसाचा सागर १४ एप्रिलची दीपोत्सवी रोषणाई दिसत नाही. अशा डोळ्यावर कातडें ओढलेल्या अवस्थेला काय म्हणावें, हा गूढ प्रश्न नव्हे काय ?

## टीकाकार

मराठी पत्र सृष्टीत टीकाकारांची विनीची परंपरा म्हणून जबरदस्त अशी मानली जाते. टिळक, आगरकर, केळकर, खाडीलकर, कोल्हाटकर, काळकर्ते पराजपे, विष्णुबुवा ब्रह्मचारी, चिपळूणकर इत्यादिंच्या टीकालेखानीं तत्कालिन वातावरण तग होतें, नव्हे तर टिळक आगरकरावरील खटल्यात महात्मा फुल्यानी फंड गोळा करून त्याची सुटका केली केळकरावर दोन खटले भरले गेले तसेच अलिकडे आदेशाविरुद्ध अत्रे खटला गाजला होता. याशिवाय यांचे वाद सुद्धा संस्मरणीय होत टिळकाचा राजकारणवाद, आगरकराचा समाजसुधारक वाद, गोखल्याचा मवाळ वाद, काळकर्ते परांजप्याचा विशिष्ट वाद, मिशनऱ्याविरुद्ध विष्णुबुवा ब्रह्मचारी अत्रे फडके, अत्रे माटे असे तुमुल युद्धासारखे वाद गाजले असे हे वादविवादपटु टिकाकाराना तत्कालीन म. फुले, लोकहितवादी, गोपाळबाबा वालकर, शि. जा. कांबळे कि फा बनसोड याचा कंठशोष काहींच कसा जाणवला नाहीं ?

टिकाकारासबधाने राज्यपाल श्रीप्रकाश म्हणतात :—

"वृत्तपत्रांत कोणावर टिका करावयाची असेल तर सेक्रेटरी ऑफ स्टेट याचेवर करा. त्याचा कंटाळा आला तर व्हॉयसरायवर करा. आणि थोडा बदल हवा असेल

तर अन्य प्रांताच्या गव्हर्नरवर टिका करा. आपल्या प्रांताच्या गव्हर्नरवर टिका करताना थोडी काळजी घ्या. जिल्हा कमिशनवर टिका करताना जरा अधिक काळजी घ्या पण पोलीस सब इन्स्पेक्टरवर टिका करावयाची असेल तर फार विचारपूर्वक आणि सर्व बाजूनी दक्षता ठेवून टिका करा कारण धन दौलतीच्या मालकाना फक्त दोन डोळे असतात तर चोरणाऱ्या चोरांना चार डोळे असतात तेव्हां त्यांना पकडणाऱ्या पोलीसास आठ डोळे असतात कारण 'लिडर' पत्रकात टिका केल्यामुळें चिंतामणी-सारख्याना जबरदस्त मार बसला. (लोकमित्र ११-९-६१). हे जरी राज्यपालानीं सागितलं असलं तरी टिकाकाराचा स्वभाव तो स्वभाव.

जिथ जिथ म्हणून अन्याय उपेक्षा पिळवणूक जबरदस्ती दिसेल, त्याचप्रमाणें सरकार आणि शत्रूपक्ष यावर खास अभ्यासपूर्ण सडकून टिका करण्याची टिकाकार दक्षता घेतात नव्हे तर तुटून पडतात. पण वर म्हटल्याप्रमाणें तत्कालिनानी व साप्रतानी अशी प्रवृत्ति दलितांच्या अठराविश्वे दारिद्यावर घृणास्पद धर्मसंस्कृतीवर जोरजुलूमादि अत्याचारावर, अन्यायावर तेवढ्याच तीव्रतेनें दाखविल्याचें निदान दलिताना तरी स्मरत नाहीं

गतकालीन झालेल्या घटनाच्या टिका लेखाचे शास्त्र बनून त्या बौद्धिकाचा आस्वाद मोठ्या चविष्टपणें आजचे साहित्यिक घेतात. तसेंच प्रसगी झालेल्या कोर्ट खटल्याबद्दलची फुशारकी बौद्धिकतेच्या निकशावर मारतात आणि राष्ट्रीय आघाडीचे म्हणून शेखी मिरवतात परंतु त्या मानानें आमच्या दलित समाजाच्या वर्तमान पत्राचीं बौद्धिकें सुद्धा काही कमी नाहीत. नागपूरला 'सिद्धार्थ अरुणची' झोंबी बघण्यासारखी होती, तर पुरीं साडेतीन वर्षे प्रबुद्ध भारत व रिपब्लिकन या दोन पत्राची झगाझंगी दुरुस्त आणि नादुरुस्त या वादाखालीं जनतेला कुस्तीच्या फडांतील श्रोत्याचं स्वरूप देणारी अशी होती.

असो. हे सर्व टिका कारभारातर्गत सोईच असलं तरी त्या दृष्टीने हीं सर्व वर्तमानपत्रे जेवढी दक्ष अन् तत्पर असतात. तेवढीच ती आम्ही म्हणतो त्या आंबेडकरी अंतःप्रवाहासबधानें का दक्ष नाहीत. या प्रचड प्रश्नाच नवल वाटते. वृत्तपत्रकार व टिकाकार, कोर्ट व सरकार व अन्य कोणासही न भिता बेडरपणें आपला व्यवसाय चालवित असतो, मग अशा या झुजार बेडरानी, निर्भिड आग्रदूतानी या विसाव्या शतकात का दखल घेऊ नये, हे सर्व या क्षेत्राचे का सहप्रवासी होऊ शकले नाहीत? तर महात्मा गाधी म्हणतात

त्याप्रमाणे " डॉ. आंबेडकर हे हिंदू धर्माला मिळालेले आव्हान आहे " असे आणि ते अव्हान सर्वांनी स्वीकारल्यामुळें " हिंदुस्थानात समाज सुधारणेला मित्राची संख्या अत्यल्प आणि टिकाकार मात्र फार आहे ", असे डॉक्टर आंबेडकर म्हणतात. अशी ही वस्तुस्थिती तत्कालिन असली तरी स्थूल मानाने पाहिल्यास **पत्राचें प्रमाण** आज भारतात पाऊण लाख माणसामागे एक वृत्त पत्र पडते. तर दलिता मध्ये ते आठ लाख दलितामागे एक वृत्त पत्र बसते भारतीय पत्राच्या सर्व साधारणपणे सरासरी खपावरून कमीत कमी पाच पांच माणसाच्या जमावामध्ये एक प्रत सहज वाचनात बसते, तर दलितामध्यें एक हजार माणसाच्या जमावामध्यें दलित वृतपत्राची एक प्रत वाचनात बसतें.

## लौकिक ऋण

जगातील इतर राष्ट्रातील वर्तमान पत्राची प्रगती आणि खप व आमच्या पत्राचे स्वरुप पाहिल्यास विलक्षण आश्चर्य वाटतें.

डॉ. बाबासोहब आंबेडकराच्या भाषेत " लौकिकी ऋणाची बुझ थोडी तरी राखा, या संदर्भाप्रमाणेच याच अतःप्रवाहातील आमच्या काहीं वृत्त पत्राची स्थिती आहे. नागपूरहून निघणार " बौद्ध भारत " पत्राचे सपादक पहिल्या वाढदिवसा निमित्ताने प्रस्फोटक आत्मनिवेदनात ते म्हणतातः—

" महाराष्ट्रात शतकाचे किंवा पाऊण शतकाचे आयुर्मान पाहिलेली भाग्यशाली वृत्त पत्रे आज तारुण्याच्या जोमाने सुस्थितींत चाललेली दिसत आहेत. मुंबईहून निघणारे 'प्रबुद्ध भारत' बाबानी चालू केले असले तरी एकाच वृत्तपत्राने व तेही केवळ आठ पानी साप्ताहिकाने हे अवाढव्य कार्य होणेच शक्य नाही अशी शेकडो वृत्त पत्रे आपल्यातून निर्माण व्हायला पाहिजेत. आपल्यात आजपर्यंत ती मुळीच निर्माण झाली नाहीत असे नाही पण ती सारी अल्प जीवी ठरलींत. दिर्घायुषी झाली नाहीत हे असे का होते व त्याना दिर्घायुषी कसे करता येईल हाच खरा प्रश्न आहे .. पुरेसे भाडवल व काम करणारी माणस नाहीत. स्वतःच्या मालकीचा प्रेस नाही पगारी वार्ताहर बातमीदार नाहीत, एजंट नाहीत, पगारी विक्रेते नाहीत, वृत्तपत्र व्यवसायातिल अनुभव नाही, अशा बिकट परीस्थितीत "बौद्ध भारताचा" जन्म झाला अगदीच अनभिज्ञ व्यवसायात चाचपडत आम्ही पाऊल ठेवलं खडकावर उगवलेलं हे अंकूर कसें जगावें, पण जगले. जनतेच्या सहकार्यांचा प्रेमळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .......... .. दि:
33 क्रमांक ........ ग्रं वि......

ओलावा रूपी खत पाणी आणि प्रकाश मिळून तो आजवर जगला आणि वाढीस लागला ...... ..ही एक आपल्या समाजाची तेजस्वी बाजू झाली पण दुसरी ही बाजू आहे व ती भयानक आहे, ती ही कथन केल्याशिवाय पूर्ण सत्य सांगितल्यासारखें होणार नाही. आमचे काही एजंट आहेत, काहीं बेफिकीर आहेत काही आपल्याच पोळीवर तूप ओढणारे असून तुमचे कितीही नुकसान झाले तरी ते न पाहता, ते फक्त आपल्या कमिशनचाच सदैव विचार करतील. अन्यत्र दिलेल्या नावाच्या जंत्रीवरून वरील पैकीं कोणत्या वर्गात कोणता एजंट मोडतो हें वाचक ठरवतीलच.

एजंट पैसे पाठवत नाहीत, त्यामुळे आम्हास बाहेरून कर्ज घेऊन काम करावे लागते. सम्यक् विचार एजंटाना येवो म्हणजे या कार्यातील मुख्य अडचण कमी होईल. तसेंच आपल्या समाजात जबाबदार समजले जाणारे कार्यकर्ते आहेत. परंतु त्याला केवळ तेच जबाबदार आहेत हेच विधान आमच्याकडे प्रत्यही काही एजंटाकडून येणाऱ्या कागाळ्यावरून आम्ही केले आहे. उधारीवर अंकाच्या प्रती घ्यावयाच्या व महिन्याला रक्कम देण्याचा करार करायचा परंतु त्याला प्रामाणिकपणें जागावयाच नाहीं.''

अशा प्रकारची अतःस्थ दुखणी 'बोधिसत्व' पुणें, 'बहुजन' अजमीर, 'भिमज्योती' जळगाव, 'उद्धार' मुंबई, 'जयभीम' बडनेरा वगैरे पत्रानी वेळोवेळी प्रसिद्ध केली आहेत. तरी मनोव्यथा विव्हळत बसण्यांत काय हशील ? या सुधारणार्थ मार्गदर्शनाचे काहीं प्रयोग-प्रयत्न प्रभावी झालेत आणि परिणामी ते हितावह ठरले आहेत.

## पत्रकारी मार्गदर्शन

माननीय भैय्यासाहेब ऊर्फ यशवंतराव आंबेडकरानी स्वतः ते 'जनतेचे' संपादक असताना त्यानी नव्या दमाची लेखकाचीं कुमक विश्वासांत घेतली. व 'जनते'मध्यें (१) तुमचा प्रश्न आमचे उत्तर. (२) गोफण आणि धोंडा. (३) वृत्तसार. (४) व्यक्ति आणि कार्य. (५) जनतेचं पार्लमेंट, कथा, कविता, स्फुट लेख वगैरे नवीन सदरें चालविणारे संपादक मंडळ नेमलें त्यामध्यें प्रा. यादवराव गांगुर्डे, राम पाठाडे, राम उपशाम, वसंत पाटोळे, य. मु. गायकवाड, टी पी. आडसूळ, आ. श्री. रणपिसे, सखाराम तांबे, अशी मडळी होती. या मंडळीनी दीर्घ परिश्रमानें जनतेचा दर्जा उचावला व वृत्तपत्रिय कार्य

सौकर्यास्तव मोठ्या चिकाटीने या मंडळींनी श्री. दा. म. शिर्के संपादक 'गरूड' यांचे अध्यक्षतेखाली आर. एम्. भट हायस्कूल हॉलमध्ये रविवार दि. १५–५–१९५५ रोजीं 'जनता' पत्र वाचक, लेखक, हितचिंतक, एजंट, पृच्छक, आजी माजी सपादक याचे अपूर्व पण भव्य स्नेहसम्मेलन भरविले होते. या प्रसगी 'जनता' पत्राचे सर्व माजी संपादक हजर होते. लेखकांपैकी त्रि. तू. जाधव. प्रा. कर्डक. घनश्याम तळवटकर, हरीभाऊ पगारे, नरेंद्र के. मोरे तसेच बी. सी. कांबळे आणि चा. भ. खैरमोडे हे सहकुटुंब हजर होते. तसेच समाजांतील मान्यवर पुढारी आणि कार्यकर्ते व महाराष्ट्रातील प्रतिनिधी बहुसंख्येने हजर होते. या प्रसंगी आपल्या वृत्तपत्रिय क्षेत्राच्या अडीअडचणींवर विस्तृत पणें चर्चा झाली आणि सम्मेलन यशस्वीरित्या पार पडले. दुसरा प्रयत्न म्हणजे महाराष्ट्र दलित साहित्य संघातर्फे भरलेल्या पहिल्या साहित्य सम्मेलन प्रसंगी दलिताच्या सर्व वृत्तपत्राचे मोठे प्रदर्शन भरविले होतें तें हजारो लोकानी पाहिले.

तिसरा प्रयत्न म्हणजे 'प्रज्ञा' अंकाचे उद्‌घाटनानिमित्त चैत्य भूमिवर काहीं साहित्यिकानी निष्ठा व्यक्त करून ती मंडळी वृत्तपत्र कार्यांत सामुदायिक प्रयत्नाने प्रकाशने काढण्याच्या प्रयत्नात आहेत. चौथी बाब म्हणजे महाराष्ट्र दलित साहित्य संघाच्या तर्फे पुणे येथे भरलेल्या तिसऱ्या साहित्य सम्मेलनात स्वत: मी या विषयावर खास प्रबंध वाचन केले.

पांचवा प्रसंग म्हणजे प्रबुद्ध भारताचे संपादक शंकरराव खरात यानी 'अस्पृश्यांचा मुक्ती संग्राम' या ग्रंथात वीस बाविस पत्रांचा उल्लेख तर केलाच, पण 'टिळक स्मारक मंदिराच्या' परीसंवादात आजची मराठी वृत्तपत्रे या विषयावर भाषण करताना डॉ. बाबासाहेबाच्या पत्राचा खास उल्लेख करून आमच्या समाजाला ती गॅझेट वाटत या पत्रात येईल ते खरे बाकी पत्रांतील खोटे अशी समाज श्रद्धा त्यावेळी होती. शेवटी मध्यम वर्गीय संस्कृतीच्या पकडीतून मराठी वृत्त पत्राची सुटका झाली पाहिजे असा स्पष्ट आग्रह ते धरतात हे भाषण फारच परिणामी झाले व वृत्त पत्रात गाजले. अशा प्रकारे आणखी काही प्रयत्न झाले असतील आणि हा समाज ज्ञान पिपासेन सर्व आत्मसात करीत आहे

फार लांब कशाला, भारतीय अस्पृश्याप्रमाणेंच अमेरिकेमध्यें महात्मा अब्राहम लिंकननें १८६३ साली गुलामाच्या मुक्ततेचा कायदा पास केला. म्हणजे या मुक्तिदिनाची शताब्दी येत्या वर्षावर येऊन ठेपली आहे आणि या गुलाम निग्रोचे

अध्वर्यु बुकर टी. वॉशिंग्टन याचा मृत्यु १९१५ सालीं झाला, तेव्हा बुकर देखतच्या पन्नास वर्षांमध्यें या निग्रोलोकात जो उत्स्फूर्त बदल झाला. त्याचें सार्थ चित्र म्हणजे बुकरचे चळवळींत निग्रोनीं चालविलेलीं २५० वृत्तपत्रें होतीं आणि ती प्रगत परंपरा वर्धिष्णू साहित्याची ज्वलंत साक्ष म्हणजे कुमारी इरा बेल थॉमसन हिच्या संपादकत्वाखालीं "एबोनी" हें मासिक आज सात लाखावर खपतें.

तरीही या संपादिकीचें महत्त्वाकांक्षी लक्ष्यवेध हें मासिक इंग्रजी "लाईफ" या सचित्र मासिकासारखें निघावें असें आहे यावरून जागतीक किर्तिचे पॉल रॉबसन सारखे गायक, थामसनसारखी संपादिका अनेक लेखक, नट, तंत्रज्ञ व योद्धे यांनी ह्या अल्पसंख्यांक मागास वर्ग फार झपाट्यानें स्वतःला बदलून घेत आहे. प्रगतीचे सर्व मार्ग आत्मसात करीत आहेत.

## सर्वांचा सामाजिक ध्येयवाद

शेवटीं आमच्या दलित वृत्तपत्राचे प्रयोजन बाबासाहेबाच्याच शब्दांत सागावयाचें झाले तर......... .. "मला पाच मिनिटांत माझ्या जीवनाचें तत्त्वज्ञान सागायचे आहे. तत्त्वज्ञान या शब्दाचा अर्थ ह्या संदर्भात मी सामाजिक तत्त्वज्ञान असाच समजतो ..... माझ्या तत्त्वज्ञानाचें मूळ राजकारणात नसून धर्मात आहे......हिंदु समाजात क्रांती घडवून आणूं शकेल असेंच माझें क्रातीकारक तत्वज्ञान आहे.... .आज भारतीय व्यक्ती दोन निरनिराळ्या ध्येयवादानी नियन्त्रित आहेत राज्य घटनेच्या प्रस्तावात सूचित केलेला ध्येयवाद आणि धर्मात अंतर्भूत केलेला सामाजिक ध्येयवाद. ज्याला समज आहे त्याला कळ शकेल कीं हे दोन परस्पर विसंगत ध्येयवाद आहेत. राजकीय ध्येयवादामुळें स्वातंत्र्य समता व सहभाव या जीवनाला मान्यता मिळाली आहे. सामाजिक ध्येयवादामुळें हीं तत्वें नाकारलीं गेलीं आहेत, अस हें विसंगत जीवन किती काळ चालणार ? कधींतरी एकाला दुसऱ्याला शरण गेल्याशिवाय उपायच नाहीं, माझ्या जीवन तत्वज्ञानावर माझा पुरेसा विश्वास आहे आणि म्हणूनच **जो आज बहु संख्य भारतीयाला राजकिय ध्येयवाद आहे, तो सर्वांचा सामाजिक ध्येयवाद होईल अशी मला उमेद आहे.** ( दि. ३–१०–५४ दिल्ली आकाशवाणी, आंबेडकरांचे भाषण )

## संकल्प आणि परिपूर्ति

भारतीय दलितांनी आणि बौद्धांनी अमेरीकेतील निग्रोचें उदाहरण लक्षात घेतल्यास उपरिनिर्दिष्ट बाबासाहेबाचा ध्येयवाद पुढे आणण्याच्या दृष्टीने वर्तमान पत्रे ही बौद्धिक चैनीची गरज नसून ती एक जीवनावश्य वस्तू बनलेली आहे. वृत्तपत्र हे राष्ट्राच्या सास्कृतिक विकासाचे साधन व गमक बनले आहे. वृत्तपत्रे समाजाचा अर्धा मेंदू होत, हे जाणून सामाजिक, राजकिय, धार्मीक दृष्ट्या बाबासाहेबाच्या उर्वरित सर्व ध्येयवादाच्या व संकल्पाच्या परिपूर्तिस्तव साप्रत वर्तमान पत्र या भूमिची काळजी महत्वाची होय. म्हणून सर्व दलित आणि बौद्धानीं जागृतपणे आपल्या सूचना, कल्पना, अपेक्षाच्या पत्राचा पाऊस पाडून देणग्या वर्गण्या आपुलकीचा सतत वर्षाव करून आमच्या वृत्तपत्रिय कार्यालयाच्या झोपा उडविल्या पाहिजेत व या क्षेत्राला क्रांतिचक्राची गती आली पाहिजे, तेणेंकरून प्रत्यक्षात "चरथ भिक्खवे चारिकम्........" हा रव भारताच्या दाहीदिशा सतत घुमला पाहिजे.

— समाप्त —

# परिशिष्ट १ लें

## लोक संख्येच्या प्रमाणांत दलित शिक्षित व वृत्तपत्रें यांचा फरक समजण्यासाठीं भारत, महाराष्ट्राचें आकडे

| सन | | एकुण लोकसख्या | शिक्षित लोक | | अस्पृश्य | मागासलेले | एकुण वृत्तपत्रें |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | | | |
| १९५१ | भारत संघ | ३६११५१६६१ | ४५६१०४३१ | १३६५०६८३ | ५५३२७०३१ | २२५११८५४ | ५९३२ |
| १९६१ | | ४३६४२४४२९ | ७२२५००५२ | २६९६५७२८ | ७७८३८८७५ | | ७६५१ |
| १९४१ | महाराष्ट्र | २६५४४४१२ | | | ४७००४९ | | १६६ |
| १९५१ | | ३२००३०८६ | ७८७०१८६ | २५७८१६४ | ३९६६२०८ | १५९३८५७ | १७७ |
| १९६१ | | ३९५०४२९४ | ८५४४२२८ | ३१८७०४४ | ४०७२००० | १५४९००० | |

# परिशिष्ट २ रें

## भारतीय वृत्तपत्रांच्या प्रगतीशीं दलितांच्या पत्रांची तुलना.

| इ सन | वृत्तपत्रें | नियतकालिकें | दलित वृत्तपत्रें |
|---|---|---|---|
| १८८० | ३२८ | ३२२ | ३ |
| १८९० | ५२६ | ३०२ | – |
| १९०० | ६७५ | ४६५ | १ |
| १९१० | ७२६ | ८२९ | – |
| १९२० | ९४१ | २१५२ | २१ |
| १९३० | १६९३ | ३०५७ | ३५ |
| १९५० | | ४७६९ | – |
| १९६० | १४६४ | ७१०४ | ४० |

# परिशिष्ट ३ रें

## महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें व भारतीय भाषावार प्रमाण आणि लोकसंख्या.

| भाषा | भारतीय पत्रांचे टक्केवारी प्रमाण १९५१ व १९६१ | १९५८ एकूण पत्रें | १९५९ एकूण पत्रें | दैनिक | द्वि सप्ताहिक | त्रि सप्ताहिक | साप्ताहिक | पाक्षिक | मासिक | द्वै मासिक | त्रै मासिक | ष मासिक | वार्षिक | दलितांचीं पत्रें | भारतातील भाषिक लोक संख्या | धर्म |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी | ४ १<br>२० ३ | ३८३ | ४७९ | २० | १ | १ | ३९ | २४ | २०५ | २५ | १०९ | ८ | ५५ | – | ( ८२ लक्ष | ख्रिस्ती ) |
| मराठी | २ ६<br>५ २ | ३८७ | ५१० | ५० | २ | ४ | १५४ | ३१ | १४५ | ५ | २७ | ५ | १०१ | १५ | २७०४९५२२ | |
| गुजराती | २ ३<br>६ ८ | ५१७ | ५७३ | ३५ | – | २ | ११४ | ४८ | २८४ | १९ | २२ | ३ | २६ | १ | १६३१०७७१<br>( १६ लाख | जैन ) |
| हिंदी | ७ ६<br>१८ ८ | १०४ | ११२ | ९ | – | १ | २२ | ५ | ५८ | – | ४ | ६ | ६ | – | १४९९४४३११<br>( ३०॥ कोटी | हिंदू ) |
| उर्दू | ७ . ०<br>८ २ | ४९ | ३१ | ९ | – | – | ९ | २ | ९ | – | – | – | १ | – | ( ३॥ कोटी | मुसलमान ) |
| सिंधी | – | – | ४५ | २ | – | – | १२ | ५ | १५ | १ | – | – | ६ | – | ७४५४३४<br>( २ लाख | बौद्ध ) |
| इतर | – | – | २४ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ( १७ लाख | इतर ) |

# परिशिष्ट ४ थें

## जगांतील प्रमुख देशांबरोबर भारतीय वृत्तपत्रांची प्रगति

| देश | सन १८२८ | १८८६ | १९०० | १९२० | १९३० | दैनिके | सरासरी खप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अमेरिका | ३६१ | ४००० | १५९०४ | २०९४१ | २०००० | २००० | ५ कोटी ७५ लाख |
| ग्रेटब्रिटन | ४८३ | १२६० | २९०२ | २३२१ | ४२५० | डेली-एक्सप्रेस …… | ३४ लक्ष १३ हजार |
| | | | | | | ,, मिरर … | २५ लक्ष ०० ,, |
| | | | | | | ,, हेराल्ड …. | २१ ,, ५० ,, |
| | | | | | | ,, मेल …… | १० ,, २७ ,, |
| फ्रान्स | ४९० | १९४० | २४०० | – | ३५०० | डेली लुमानिते …… | ५ ,, ,, |
| जपान | – | २७७७ | १७७५ | २००० | ६००० | डेली-असाही<br>,, निप्पान टाईम्स<br>,, माइनिची<br>,, जपान न्यूज | ४० लक्ष |
| रशिया | ८४ | २००० | २८०+९१३ | १०५५ | ५६०० | ९५४४ चा | ६ कोटी ८६ लक्ष |
| हिंदुस्थान | – | ५०३ | ६५० | १०९४ | २६९७ | डेली इंडियन एक्सप्रेस, | १ लक्ष ७ हजार (इंग्लीश) |
| | | | | | | टाईम्स | १ ,, ० ,, ,, |
| | | | | | | ,, अमृत बझार पत्रिका | ० ,, ७५ ,, (हिंदी) |
| | | | | | | ,, थंथी …… | ० ,, ८० ,, (तामीळ) |
| | | | | | | ,, लोकसत्ता …… | ० ,, ७० ,, (मराठी) |
| | | | | | | ,, मराठा …… | ० ,, ६५ ,, ,, |
| | | | | | | ,, केसरी …… | ० ,, ३० ,, ,, |

# परिशिष्ट ५ वे

## अस्पृश्य समाजाची वर्तमान पत्रे

| अ नं | वृत्तपत्राचें नांव | संपादक | स्थळ | सन | भाषा | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सत्यशोधक | महात्मा फुले | पुणें | १८७० | मराठी | साप्ताहिक |
| २ | दीनबंधू | कृष्णराव भालेकर | ,, | १८७२ | ,, | ,, |
| ३ | विटाळविध्वंसक | गोपाळ बाबा वालंगकर | ,, | १८८८ | ,, | मासिक |
| ४ | सुधारक | गो ग. आगरकर | ,, | | ,, | ,, |
| ५ | मराठा दीनबंधू | कि. फा बनसोड | नागपूर | १९०२ | ,, | पाक्षिक |
| ६ | सोम वंशीय मित्र | शि. जा कांबळे | पुणें | १९०९ | ,, | ,, |
| ७ | दिन मित्र | मुकुंदराव पाटील | तरवडी | १९१० | ,, | साप्ताहिक |
| ८ | हिंदनागरिक | कि फा बनसोड | नागपूर | १९१० | ,, | ,, |
| ९ | मजुर पत्रिका | ,, ,, ,, | ,, | १९१८ | ,, | ,, |
| १० | मूकनायक | सपा डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>सहसंपा. पा. ना मटकर | मुंबई | ३१-१-१९२० | ,, | ,, |
| ११ | बहिष्कृत भारत | गणेश अकाजी गवई | अमरावती | १९२० | ,, | मासिक |
| १२ | आदि हिंदू | शि. जा. कांबळे | पुणें | १९२४ | ,, | साप्ताहिक |
| १३ | आत्मोध्दार | महादेव अबाजी कांबळे | मुंबई | १९२४ | ,, | मासिक |
| १४ | अस्पृश्यतानिवारण | दा ना. पटवर्धन | ,, | १९२४ | ,, | साप्ताहिक |
| १५ | गरुड | दा. म. शिर्के | कोल्हापूर | १९२६ | ,, | ,, |

| अ नं | वृत्तपत्राचें नांव | संपादक | स्थळ | सन | भाषा | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १६ | बहिष्कृत मित्र | पाटील व घोलप | | १९२७ | मराठी | मासिक |
| १७ | बहिष्कृत भारत | संपा डॉ बाबासाहेब आंबेडकर<br>सहसंपा ज्ञा ध्रु घोलप | मुंबई | ३-४-१९२७ | ,, | साप्ताहिक |
| १८ | समता | देवराव नाईक | ,, | २९-६-१९२८ | ,, | ,, |
| १९ | सारथी | घोलप | ,, | १९२८ | ,, | मासिक |
| २० | तरुण बहिष्कृत | — — — | जळगांव | १९२९ | ,, | ,, |
| २१ | जनता | संपा डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>सहसंपा पु ग सहस्रबुद्धे<br>,, देवराव नाईक<br>,, भ. र कद्रेकर | मुंबई | ३०-११-१९२९ | ,, | पाक्षिक<br>साप्ताहिक |
| २२ | दलितबंधू | पा ना राजभोज | पुणें | १९२९ | ,, | साप्ताहिक |
| २३ | नवजीवन | डॉ मोरे | मुबई | १९३० | ,, | मासिक |
| २४ | चोखा मेळा | कि फा. बनसोड | नागपूर | १९३१ | ,, | साप्ताहिक |
| २५ | भारत | शंकर मास्तर व बी जे देवरुखकर | मुंबई | १९३२ | ,, | ,, |
| २६ | महारठ्ठा | बाबू हरदास एल् एन्. | कामठी | १९३३ | ,, | साप्ताहिक |
| २७ | सेवक | सो. ना भेढे | जळगांव | १९३८ | ,, | ,, |

| अ. नं. | वृत्तपत्राचें नांव | संपादक | स्थळ | सन | भाषा | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| २८ | मराठा | मिंढे पाटील | पुणें | १९४१ | मराठी | साप्ताहिक |
| २९ | दलितसेवक | वि नि उपाध्ये | धुळें | १९४१ | ,, | ,, |
| ३० | उद्धार | वसंत पाटोळे | मुंबई | १९४२ | ,, | मासिक |
| ३१ | मराठी हरिजन | गो नी. काळे | वर्धा | १९४५ | ,, | साप्ताहिक |
| ३२ | लोकसेवक | शं ब. भोसले | कोल्हापूर | १९४६ | ,, | ,, |
| ३३ | दलित निनाद | मा. ई कुरणे | ,, | १४-४-१९४७ | ,, | ,, |
| ३४ | अरुण | ना. खं तिरपुडे | नागपूर | १०-६-१९४७ | ,, | ,, |
| ३५ | लोकमित्र | जी ए. शेजवळ | मुंबई | १-११-१९४७ | ,, | मासिक |
| ३६ | सिध्दार्थ | दि. मा. खैरकर | नागपूर | १४ ४-१९४७ | ,, | पाक्षिक |
| ३७ | पूजा | ना रा शेंडे | ,, | १-११-१९४७ | ,, | मासिक |
| ३८ | दलितभारत | घ. रा बिन्हाडे | जळगांव | १९४७ | ,, | साप्ताहिक |
| ३९ | माणूस | डी ए कट्टी | निपाणी | | ,, | ,, |
| ४० | पीपल्स हेरॉल्ड | जोगेंन्द्रनाथ मंडल | कलकत्ता | | इंग्रजी | ,, |
| ४१ | जय भीम | सौ मिनाम्बल एन् शिवराज | मद्रास | | ,, | ,, |
| ४२ | चॅलेंज | परमार | अहमदाबाद | | गुजराथी | ,, |
| ४३ | सावधान | प्यारेलाल कुरील तलीब | कानपूर | | हिंदी | ,, |

| अ. नं. | वृत्तपत्राचें नांव | संपादक | स्थळ | सन | भाषा | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| ४४ | पिछडा वर्ग | — — — | उत्तरप्रदेश | | हिंदी | साप्ताहिक |
| ४५ | जागृती | द सा गायकवाड | पुणें | १९४८ | मराठी | ,, |
| ४६ | सहकार | ,, ,, ,, | ,, | १९४९ | ,, | ,, |
| ४७ | जयभीम | सुरेश संसारे | मुं बडनेरा | १४-६-१९४९ | ,, | ,, |
| ४८ | प्रभा | र. मा धानकुटकर | मुंबई | १४-४-१९४९ | ,, | वार्षिक |
| ४९ | सिद्धार्थ | चद्रकांत गायकवाड | ,, | ,, ,, ,, | ,, | पाक्षिक |
| ५० | निर्धार | आर डी भंडारे | ,, | १४-३-१९५० | ,, | साप्ताहिक |
| ५१ | नजर | नामदेव व्हटकर | ,, | १९५१ | ,, | मासिक |
| ५२ | गिरिजन | जी. एस् मराठे | नांदूरबार | ५-९-१९५३ | ,, | साप्ताहिक |
| ५३ | सिद्धार्थ | भा. शी बाभळे | वर्धा | ११-११-१९५३ | ,, | ,, |
| ५४ | जागृती | धर्मदास मेश्राम | ,, | १९५४ | ,, | ,, |
| ५५ | भीम गर्जना | भाऊसाहेब अडसूळ व आप्पा रणपिसे | मुंबई | १४-४-१९५४ | ,, | पाक्षिक |
| ५६ | प्रतिबिंब | सौ निर्गुणाबाई यादवराव गांगुर्डे | ठाणें | १४-४-१९५५ | मराठी | त्रैमासिक |
| ५७ | जनताजनार्दन | टेमरे व गवळी | मुंबई | १९५५ | ,, | मासिक |
| ५८ | धर्मचक्र | के एन्. भागवत | ,, | १९५५ | मराठी हिं.इंग्रजी | ,, |
| ५९ | प्रबुद्ध भारत | भैयासाहेब आंबेडकर | ,, | ,, | मराठी | साप्ताहिक |

| अ नं | वृत्तपत्राचे नांव | संपादक | स्थळ | सन | भाषा | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| ६० | धर्मदीप | सिद्धार्थ कुमार | नागपूर | १९५५ | मराठी | पाक्षिक |
| ६१ | बोधि सत्व | र म मेश्राम | ,, | १९५६ | ,, | ,, |
| ६२ | बौद्ध भारत | स म. मेश्राम | ,, | ,, | ,, | साप्ताहिक |
| ६३ | धर्मदूत | भिकू संघ रख्खिता | सारनाथ | ,, | हिंदी | मासिक |
| ६४ | मध्यम मार्ग | भिकू प्रज्ञानंद | लखनौ | ,, | ,, | पाक्षिक |
| ६५ | धर्मयान | का वि सवादकर | मुबई | ,, | मराठी | मासिक |
| ६६ | प्रबुद्ध युवक | रूपवते व खरात | ,, | १९५७ | ,, | साप्ताहिक |
| ६७ | बौधि सत्व | वि. रा रणपिसे | पुणें | १३-५-१९५७ | ,, | ,, |
| ६८ | भीमयुग | ना ग गायकवाड | मुंबई | १३-१-१९५७ | ,, | ,, |
| ६९ | समशेर | शिंदे पाटील | ,, | ,, | ,, | ,, |
| ७० | भीमगर्जना | एस्. जे भालेराव | ,, | १५-१ १९५७ | ,, | ,, |
| ७१ | युग पुरुष | एन् यू. पगारे | ,, | ,, | ,, | ,, |
| ७२ | भीमज्योती | शं. बा. चव्हाण | धुळें | १९५८ | ,, | ,, |
| ७३ | बुद्ध संदेश | पेंटर के शिंदे | सोलापूर | १९५८ | ,, | त्रैमासिक |
| ७४ | बौद्धमित्र | रामरतन जानोरकर | नागपूर | २३-११-१९५८ | ,, | साप्ताहिक |
| ७५ | सत्यशोधक | सु. तु. शेलार | मुंबई | १९५८ | ,, | ,, |

| अ. नं | वृत्तपत्राचे नाव | संपादक | स्थळ | सन | भाषा | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| ७६ | दलितोद्धार | भा शी बाभळे | वर्धा | १९५८ | मराठी | साप्ताहिक |
| ७७ | समता | रेवा रामजी कवाडे | नागपूर | ,, | ,, | ,, |
| ७८ | रिपब्लिकन | बी. सी कावळे | मुंबई | १४ ४-१९५९ | ,, | ,, |
| ७९ | समता | पां. ना राजभोज | पुणें | १९५९ | ,, | ,, |
| ८० | सत्यशोधक | वसंत पाटोळे | मुंबई | १९५९ | ,, | ,, |
| ८१ | हरिजनसेवक | गु रा अग्रवाल | मिरज | १९५९ | ,, | ,, |
| ८२ | मूक नायक | रमेश कांबळे | मुंबई | ,, | ,, | ,, |
| ८३ | धर्मदीप | — — — | वर्धा | ,, | ,, | ,, |
| ८४ | भीमज्योति | राम तिरपुडे | नागपूर | ,, | ,, | पाक्षिक |
| ८५ | उत्थान | राये सिंह | दिल्ली | हिंदी | ,, | मासिक |
| ८६ | पचशिल | — — — | औरंगाबाद | १९५९ | मराठी | मासिक |
| ८७ | मानवी समता | दादासाहेब चौधरी | मुंबई | १९६० | ,, | ,, |
| ८८ | भीमप्रजा | परमार | बडोदा | ,, | गुजराथी | ,, |
| ८९ | कोळी राजपूत | एम्. के. नाथसिंह तँवर | आजमेर | ,, | हिंदी | ,, |
| ९० | सम्यक् दृष्टी | राहुलासुमन छॉवरा | ,, | ,, | ,, | ,, |
| ९१ | बहुजन | छोदिलाल साथी | लखनौ | ,, | ,, | पाक्षिक |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

| अ. नं. | वृत्तपत्राचे नाव | संपादक | स्थळ | सन | भाषा | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| ९२ | निरंजना | — — — | कलकत्ता | १९६० | हिंदी | मासिक |
| ९३ | महाबोधि जर्नल | वली सिन्हा | ,, | ,, | इंग्रजी | ,, |
| ९४ | बौद्धभारत | एफ्. एस्. गोडाणे | नागपूर | ,, | मराठी | साप्ताहिक |
| ९५ | नवधारा | यशवंत बाबर | नाशिक | ,, | ,, | ,, |
| ९६ | मानवी संग्राम | बी. पी. ताजणे | मुंबई | ,, | ,, | ष. मासिक |
| ९७ | प्रज्ञा | जनार्दन वाघमारे | ,, | ,, | ,, | द्वैमासिक |
| ९८ | अण्णय | सत्यवाणी मुत्यु | मद्रास | ,, | तामीळ | मासिक |
| ९९ | शोसल रिफार्म | राज साळवे | पुणें | १९६१ | इंग्रजी | साप्ताहिक |
| १०० | मोहर | मा दा नलावडे | औरंगाबाद | १९६१ | मराठी | मासिक |
| १०१ | विद्यार्थीजगत् | वि. स. कर्डक | मुंबई | ,, | ,, | ,, |
| १०२ | प्रबुद्ध भारत | बी. पी मौर्य | अलिगढ | १९६० | हिंदी | साप्ताहिक |
| १०३ | भीमपत्रिका | एल् आर् बाली | जुलंदर | ,, | ,, | ,, |
| १०४ | तथागत | दीनबंधू शेगांवकर | अकोला | १९६१ | मराठी | मासिक |
| १०५ | ज्वाला | द सा गायकवाड | पुणें | १९६२ | ,, | साप्ताहिक |
| १०६ | सिद्धार्थ जगत् | राजाभाऊ खोब्रागडे | नागपूर | ,, | ,, | ,, |

| अ नं | वृत्तपत्राचे नांव | संपादक | स्थल | सन | भाषा | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १०७ | राष्ट्रीय हरिजन | ग० ना० कोंबळे | पुणे | १९४७ | मराठी | साप्ताहिक |
| १०८ | नागसेन | गोविंदराव मिरगे | नांदपूर | १९५८ | ,, | साप्ताहिक |
| १०९ | भिम वाणी | के० डी० भानु शाली | कल्याण | १९५८ | मराठी | साप्ताहिक |
| ११० | संग्राम विजय | नि० म० शेवाळे | मुंबई | १९५८ | ,, | मासिक |
| ११ | कॅथलिक महाराष्ट्र | रेव० फादर जे० बनसोड | पुणे | १९६१ | हिंदी | मासिक |
| [illegible] | जमीं के तारे | राम चरन सिंह | अलिगड | १९६२ | मराठी | साप्ताहिक |
| [illegible] | एकता | के० व्ही उमरे | नागपूर | ,, | हिंदी व | |
| [illegible] | बाबा साहाब | ,, -,,- ,, | ,, | ,, | इंग्रजी | मासिक |
| [illegible] | साथी | बी० एच० बागडे | ,, | ,, | मराठी | साप्ताहिक |
| [illegible] | सघामित्र | आनंदराव रा. माने | घाटकोपर | ,, | ,, | साप्ताहिक |
| [illegible] | पतित पावन | पतित पावन दासबावा | वर्धा | १९३५ | ,, | ,, |
| ११ | देशबंधु | कालीचरण नंदा गवळी | गोंदिया | १९१४ | ,, | ,, |
| [illegible] | जागृति | संस्थापक ना रा. शेंडे<br>सहसंपादक हि द. कठाणे | नागपूर | १९५० | ,, | ,, |
| १२० | रत्नदीप | सदानंद जाधव | मुंबई | १९६० | ,, | मासिक |

| | | |
|---|---|---|
|  | * आ भा र * |  |
| श्री महादेव बाबुराव पेवेकर | | सौ. रुक्मिणीबाई महादेव पेवेकर |

सर्व प्रकारच्या दानामध्यें धर्मदान श्रेष्ठ आहे धर्मदान हें ज्ञानदानानें पूर्ण होतें. ज्ञानदान म्हणजे "विद्या ज्ञानेन वर्धते" यानुसार ज्ञान प्रवाही राहिलें तर त्याद्वारें धर्मज्ञान उपलब्ध होतें थोडक्यात सांगायचें म्हणजे या सर्व गोष्टींचें साधन म्हणजे पुस्तकें होय ' व त्याची निर्मिति वरील व्यवहारानें सुलभपणें झाल्यास बरेंच मोठें कार्य होतें

अशा या ज्ञानदानाच्या कार्याला हातभार लावणाऱ्यांपैकीं श्री महादेव बाबुराव पेवेकर हे होत आज पुस्तक प्रसिद्ध करणें ही बाब सोपी नाहीं ज्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध होतात त्यांचें तें क्षेत्र विशिष्ट तऱ्हेचें असल्यामुळें इतरांना तेथें वाव नाहीं. म्हणून चांगलीं पुस्तकें प्रसृत करण्याच्या कामीं श्री. पेवेकरासारख्या अनेक हितचिंतकांची जरूरी आहे ज्ञानाचें हें उजाड रान समृद्ध करण्यासाठीं अभ्यासु लेखकांच्या जरूरीएवढीच पुस्तक-प्रसिद्धीच्या व्यवहारांत हातभार देणारांची आवश्यकता आहे ! श्री पेवेकरानीं या पुस्तकाचा सर्व खर्च वजा जाता उत्पन्नापैकीं बाकी उत्पन्न महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेला देण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें एक पंथ दोन काज साधण्याचें श्रेय त्यांनीं या औदार्यांतून घेतलें आहे अशा या व्यक्तीची ओळख इतर सामान्य जनांसारखीच आहे. विशेष कांहीं तरी करून वैशिष्ट्य मिळवावें यामुळें त्यांचें व्यक्तित्व वेगळेच असल्याचें स्पष्ट होतें. तेजस्वी नररत्नांच्या रत्नागिरी या भूमींतील गुहागर तालुक्यांतील मौजे "पेवें" या गांवचे हे महादेव बाबुराव पेवेकर खेडेगांवीं गरीब अस्पृश्याना काय वाव असणार ? अनंत हालअपेष्टादि गरीबीला तोंड देऊन महत्त्वाकांक्षी महादेवराव ऐन उमेदींत पत्नी सौ. रुक्मिणीसह कोंकण-रिवाजानुसार मुंबईस आले व दुसऱ्यांच्या चप्पल दुकानांत काम करून सुरुवातीला अत्यंत हालअपेष्टा सहन केल्या पण पुढें प्रयत्न आणि महत्त्वाकांक्षी स्वभाव ठेवून चिकाटीनें चि तुकाराम याचेसह स्वत:चें दुकान थाटलें आणि पुढें तें भरभराटीस आणलें

अशा या पेवेकरांनीं स्वत:चा जीवनव्यवसाय संभाळून लोकोपयोगी कामांतही तितकीच निष्ठा आणि त्याग व्यक्त केला त्यांच्या त्या अनेक कार्यांपैकीं सदर पुस्तका-सही त्यांनीं छापण्याचा खर्च देऊन चालना दिली त्यामुळेंच हें पुस्तक आणि त्यांतील अभिनव विषय लोकापर्यंत आणण्याची मला संधि मिळाली याबद्दल त्यांचे आभार आणि ऋण मानावें तितकें थोडेंच आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .................. दि: ..................

REI BK-0012339